cmyk

दिपावली पाडवा निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

दिपावली पाडवा निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१७६ | बुधवार, दि.२२ ऑक्टोबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### सामाजिक न्याय विभागाकडून विकासनिधी

मुंबईः सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर विधानसभा सदस्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेतून प्रत्येकी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून वितरित केला आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेद्वारे दलित वस्त्यांमध्ये विविध विकासकामे केली जातात. लोकप्रतिनिधींना त्यांच्या मतदारसंघातील सामाजिक विकासासाठी निधी देण्यात येतो. मागील काही महिन्यांपासून लोकप्रतिनिधींकडून निधीची मागणी होत होती. उपलब्ध निधी आणि मागणी यामध्ये समतोल राखत, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आमदारांना दोन कोटींचा निधी मंजूर केला आहे. हा निधी वितरित झाल्याने दलित वस्त्यांतील विकासकामांना गती मिळणार असल्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी सांगितले.

### माजी पोलीस महासंचालकांवर गुन्हा

चंडीगडः पंजाबचे माजी पोलीस महासंचालक मोहम्मद मुस्तफा आणि त्यांची पत्नी तथा माजी मंत्री रजिया सुलताना यांच्यासह चौघांविरुद्ध त्यांच्या मुलाच्या मृत्यू प्रकरणी हरयाणा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. मुस्तफा यांच्या पत्नी रजिया सुलताना या पंजाबच्या माजी मंत्री आहेत. या प्रकरणी चौघांवर हत्या आणि गुन्हेगारी कट रचल्याच्या आरोपांखाली भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) आणि ६१ अन्वये एफआयआर नोंदवण्यात आला असल्याची माहिती हरियाणा पोलिसांनी दिली. मुस्तफा आणि माजी मंत्री सुलताना यांचा ३५ वर्षीय मुलगा अकील अख्तर याचा हरयाणातील पंचकुला येथे मृत्यू झाला. शमशुद्दीन नावाच्या व्यक्तीने दाखल केलेल्या फिर्यादीनुसार, अख्तरचा मृत्यू 'संशयास्पद परिस्थितीत' झाला.

### माजी आमदार राजीव देशमुख यांचे निधन

जळगावः चाळीसगाव तालुक्याचे माजी आमदार आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे ज्येष्ठ नेते राजीव देशमुख (वय अंदाजे ६० वर्षे) यांचे मंगळवार (दि.२१) रोजी दुपारी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाने चाळीसगाव तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. देशमुख हे गेल्या काही दिवसांपासून अल्पशा आजाराने त्रस्त होते. मंगळवार (दि.२१) रोजी अचानक तब्येत बिघडल्याने त्यांना धुळे येथील रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच त्यांचे निधन झाले. ही बातमी समजताच चाळीसगाव व परिसरात शोककळा पसरली आहे. राजीव देशमुख यांनी २००९ ते २०१४ या काळात चाळीसगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून कार्य केले. या निवडणुकीत त्यांनी भाजपचे साहेबराव घोडे यांचा पराभव केला होता.

### महाराष्ट्राच्या 'व्हिजन डॉक्युमेंट'ला मान्यता

मुंबई : विकसित महाराष्ट्रासाठीच्या व्हिजन डॉक्युमेंट २०४७ ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सल्लागार समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. लवकरच हा मसुदा अंतिम मान्यतेसाठी राज्य मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येणार आहे. विकसित भारताचे ध्येय गाठण्यासाठी महाराष्ट्राचे व्हिजन डॉक्युमेंट सहाय्यकारी ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यानिमित्ताने व्यक्त केला आहे. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात विकसित महाराष्ट्र २०४७ सल्लागार समितीची बैठक पार पडली. या बैठकीस मंत्री मंगलप्रभात लोढा, पंकजा मुंडे, नितेश राणे उपस्थित होते; तर दादाजी भुसे आणि शिवेंद्रसिंह राजे भोसले हे मंत्री ऑनलाईन पद्धतीने बैठकीत सहभागी झाले. यासंदर्भात मुख्यमंत्री म्हणाले, विकसित महाराष्ट्राचा मसुदा हा ऐतिहासिक दस्तऐवज असून भविष्यात कुठलीही योजना, धोरणे बनविताना या मसुद्याचा उपयोग झाला पाहिजे. हे 'डॉक्युमेंट' महाराष्ट्राला राज्यांसोबत नाही, तर जगासोबत स्पर्धा करण्यास सक्षम बनवेल.

### सुटीची सूचना

दिपावली पाडव्यानिमित्त दि.२२ व दि.२३ ऑक्टोबर २०२५ रोजी दै.राज्य लोकतंत्र कार्यालयास सुटी असल्यामुळे दि.२३ व दि.२४ ऑक्टोबर २०२५ रोजीचा अंक प्रसिध्द होणार नाही, याची वाचक, जाहिरातदार व एजंटांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

# राज्यात शंभर टक्क्यांहून अधिक पाऊस पडल्यानेच नुकसान

## खरिपाचे पीक गेल्याने शेतकरी अडचणीत, मराठवाड्यात सर्वाधीक नुकसान

पुणे । प्रतिनिधी

**चालू वर्षी पावसाळ्यात राज्यातील अनेक भागांत कमीअधिक स्वरूपाचा पाऊस पडला. काही भागांत मुसळधार पाऊस झाला. राज्यातील ३५८ पैकी तब्बल २६५ तालुक्यांत १०० टक्क्यांहून अधिक पाऊस पडल्याची नोंद कृषी विभागाकडे झाली आहे. विशेषतः मराठवाड्यात पावसाचा जोर अधिक राहिला आहे. त्याचा परिणाम खरीप हंगामातील पिकांच्या नुकसानीवर झाला असून अनेक ठिकाणी शेतकरी अडचणीत आले आहेत.**

चालू वर्षी हवामान विभागाने १०८ टक्के पावसाचा अंदाज वर्तविला आहे. त्यानुसार पावसाने काही ठिकाणी दमदार हजेरी लावली. विशेष म्हणजे मे महिन्यात मॉन्सूनपूर्व पावसाने हजेरी लावली होती. परंतु जून व जुलै महिन्यात कमीअधिक स्वरूपात पाऊस पडला. यामध्ये एक जून ते ३० सप्टेंबर या चार महिन्यांच्या कालावधीत कोकण विभागात प्रत्यक्षात सरासरीच्या २८६८.१ मिमीपैकी २७६४.४ मिमी म्हणजेच ९६ टक्के पाऊस पडला. नाशिक विभागात सरासरीच्या ७०७.१ मिमीपैकी ६९३.१ मिमी म्हणजेच ९८ टक्के, पुणे विभागात सरासरीच्या ९४५ मिमीपैकी



८३०.४ मिमी म्हणजेच ८७ टक्के, छत्रपती संभाजीनगर विभागात सरासरीच्या ६७९.५ मिमीपैकी ९४७.८ मिमी म्हणजेच १३९ टक्के, अमरावती विभागात सरासरीच्या ७४९.८ मिमीपैकी ८६४.१ मिमी म्हणजेच ११५ टक्के पाऊस पडला. तर नागपूर विभागात सरासरीच्या १०७२.५ मिमीपैकी ११८७.८ मिमी म्हणजेच ११० टक्के पाऊस पडला. गेल्या चार महिन्यांत प्रामुख्याने कोकण, घाटमाथ्यावर आणि विदर्भाच्या पूर्व भागाच्या काही तालुक्यांत मुसळधार पाऊस झाल्याची ▶▶ पान २ वर

# शेतकऱ्यांना नुसते आश्वासन देऊन पोट भरणार नाही !

## दिवाळीनंतर मोठे आंदोलन उभा करावे लागेल ; जरांगे पाटील पुन्हा रस्त्यावर उतरणार

जालना । प्रतिनिधी

**सरकारचे धोरणच असं आहे की तात्पुरत आनंद द्यायचा. अशी चाल जाणून बुजून सरकार शेतकऱ्यांच्या संदर्भात सरकार करत असल्याचा आरोप जरांगेंनी केला. एक तर सरकारने जाहीर केलेल्या पॅकेजण शेतकऱ्यांचं काहीच होत नाही, फक्त तात्पुरता आनंद द्यायचा. तात्पुरता आनंद म्हणजे त्याचा अर्थ फसवणूक असा होतो. याला खच्चीकरण करण्याचं काम म्हणतात, त्यामुळे हे सरकार तात्पुरता आनंद सत्तेमध्ये आल्यापासून देत असल्याचाही जरंगे पाटील यांनी म्हटलं.फक्त आश्वासन देऊन शेतकऱ्यांचे पोट भरणार नाही,**



**त्याला प्रत्यक्ष मदत पाहिजे. जरांगे पाटील यांनी मंगळवारी विविध विषयावर व्यक्त होताना शेतकऱ्यांसाठी रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे.**

दरवर्षी दिवाळीत चिवड्यासोबत राजकीय फटाकेबाजी आणि फटकेबाजी करमणूक करते. दिवाळीत सर्वसामान्यांची आपली तेवढीच करमणूक होते. यंदा दिवाळीपूर्वीच राजकीय पक्षांनी फटाके फोडले. दिवाळीत त्यामुळे खरा रंग भरला नाही. पण ऐन लक्ष्मी पूजनाच्या दिवशी थोडी फार कसर भरून काढण्याचे ▶▶ पान २ वर

### छगन भुजबळ ठुसका फटाका...

ओबीसी नेते जीआर रद्द करण्याची मागणी करत असल्यावर त्यांनी झणझणीत प्रतिक्रिया दिली. तो जी आर रद्द व्हायची कुणाचीही टप्पर नाही, तो आता कधीपर्यंत सुद्धा राहणार आहे. मराठवाड्यातले मराठी आरक्षणामध्ये जाणार, परंतु छगन भुजबळ त्यांना नादी लावत आहेत. ते भेदभाव पसरवत आहेत. बीडची इतकुशिक सभा एवढं त्याला महाएल्गार नाव दिलं. त्या ग्राउंडवर आमची घोंगडी बैठक झालेली आहे आणि आम्हाला उभा राहायला सुद्धा जागा नव्हती, असा टोलाही त्यांनी भुजबळांना लगावला. भुजबळांना कोणत्याच फटाक्याची उपास चालत नाही ते ठुसकी आहेत. छगन भुजबळ हे घुरट आणि ठुसका फटाका आहेत, असा टोला जरांगे पाटील यांनी मंत्री छगन भुजबळ यांना लगावला.

# पोलीस स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून पोलीस हुतात्म्यांना अभिवादन



मुंबई । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गेल्या वर्षभरात संपूर्ण देशात शहीद झालेल्या पोलीस हुतात्म्यांना नायगाव पोलीस मुख्यालय येथील पोलीस स्मृतिस्तंभावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली.

यावेळी मुंबई उपनगरचे सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, विविध देशांचे मुंबईतील वाणिज्यदूत व प्रतिनिधी, वरिष्ठ पोलीस अधिकारी व निमंत्रित यांनी देखील पोलीस स्मृतिस्तंभाजवळ जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या ▶▶ पान २ वर

# एका वर्षात दोनवेळा शिष्यवृत्ती परीक्षा



पुणे–बीड । प्रतिनिधी

राज्यातील विद्यार्थ्यांसाठी घेतली जाणारी शिष्यवृत्ती परीक्षा आता पाचवीऐवजी चौथी आणि आठवीऐवजी सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी घेतली जाईल. यंदाच्याच शैक्षणिक सत्रापासून या नव्या पद्धतीची अंमलबजावणी होणार आहे. या वर्षात दोनवेळा शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाणार असून पुढील वर्षी नव्या पद्धतीने एकाच परीक्षेचे आयोजन केले जाईल. राज्यात पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि आठवीसाठी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते. यंदाच्या वर्षापासून या पद्धतीत बदल करण्यात येणार आहे. आता पाचवीऐवजी चौथी तर आठवीऐवजी सातवीच्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा ▶▶ पान २ वर

### विद्यार्थ्यांमध्ये झाली होती घट

महाराष्ट्रात ही शिष्यवृत्ती परीक्षा १९५४–५५ पासून घेण्यात येते. पाचवी आणि आठवी या वर्गासाठी २०१६–१७पासून परीक्षा घेण्यात येते आहे. त्यापूर्वी ती चौथी आणि सातवीसाठी घेण्यात येत होती. मात्र, पाचवी आणि आठवीसाठी परीक्षा घेणे सुरू झाल्यानंतर परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट झाली होती. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा आणि विद्यार्थी व शिक्षक यांच्या गुणवत्तेत वाढ व्हावी, या हेतूने शिष्यवृत्ती परीक्षेच्या नियमांत पुन्हा बदल करण्यात आले आहे.

# धाराशिवमध्ये दोन कारचा भीषण अपघात; ४ ठार

धाराशिव । प्रतिनिधी

ऐन दिवाळीत आक्रित घडले अन् उत्सवावर शोककळा पसरली आहे. धाराशिवमध्ये दोन महागड्या आलिशान कारची जोरदार धडक झाली. या भीषण अपघातामध्ये चार जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर दोन जण जखमी आहेत. जखमींची प्रकृती गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक माहितीनुसार, कार वेगात होती त्याचवेळी अचानक रस्त्यावर कुत्रा आल्याने हा अपघात झाल्याचे समोर आले आहे. सोलापूर–हैदराबाद



महामार्गावर हा अपघात झाला. दोन वाहनांच्या भीषण अपघातानंतर महामार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली होती.

उमरगा तालुक्यातील डाळिंबजवळ सोलापूर–हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर सफारी आणि ग्रँड वितारा या दोन महागड्या गाड्यांची जोरदार धडक झाली. या अपघातात चौघांचा जागेवरच मृत्यू झाला. तर दोन जण जखमी झाले, त्यांना उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. पोलिसांनी अपघातग्रस्त वाहने बाजूला करून वाहतूक सुरळीत केली. पोलिसांनी ▶▶ पान २ वर

# रेशनकार्ड धारकांना मिळणार मोफत ज्वारी

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी गेल्या वर्षी ज्वारीचे विक्रमी उत्पादन घेतले, ज्यामुळे राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर ज्वारीची खरेदी केली आहे. आता ही ज्वारी सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नोव्हेंबर २०२५ पासून पुढील दोन महिन्यांसाठी राज्यातील रेशन दुकानांमार्फत पात्र कुटुंबांना ज्वारीचे मोफत वाटप केले जाणार आहे. या योजनेचा लाभ लाखो कुटुंबांना मिळणार असून, विशेषतः सणासुदीच्या काळात गरीब आणि वंचित घटकांना मोठा दिलासा मिळेल, अशी अपेक्षा आहे. ▶▶ पान २ वर

# ऐसा कोई सगा नही, जिसे भाजपने ठगा नही, अजित पवार किस खेत की मूली

## संजय राऊत यांनी भाजप–राष्ट्रवादी सबंधावर फोडले फटाके

मुंबई । प्रतिनिधी

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे चार आमदार भाजपच्या वाटेवर असल्याच्या राजकीय वर्तुळातील चर्चेवर शिवसेना (ठाकरे गट) चे खासदार संजय राऊत यांनी



मंगळवारी (दि.२१) भाजपवर बोचरी टीका करत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा अजित पवार यांना टोला लगावला. तसेच राज्यातील मतदार यादीतील घोळाबाबत १ नोव्हेंबर रोजी आयोजित मोर्चासाठी पूर्वतयारीच्या बैठका सुरू असल्याचेही ▶▶ पान २ वर

# मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा उघड

## बारा हजार पुरूषांनी बनावटगिरी करून वर्षभर उचलले पैसे

मुंबई । प्रतिनिधी

**महायुती सरकारने महिलांसाठी सुरू केलेल्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत' मोठा घोटाळा उघड झाला आहे. तब्बल १२ हजार ४३१ पुरुषांनी बनावट नोंदणी करून जवळपास वर्षभरापासून या योजनेचा गैरमार्गाने लाभ घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.**

माहितीच्या अधिकारात मिळालेल्या माहितीनुसार, या योजनेतील पुरुष लाभार्थ्यांनी प्रतिमहिना १५०० रुपयांप्रमाणे १२ हजार ४३१ पुरुषांनी मिळून सुमारे २४.२४ कोटी रुपयांचा अपहार केला आहे. याशिवाय, विविध कारणास्तव अपात्र ठरलेल्या ७७ हजार ९८० महिला लाभार्थ्यांनीही सुमारे १४०.२८ कोटी रुपये वर्षभर लाटले. यामुळे राज्याच्या तिजोरीला एकूण १६४ कोटी रुपयांचा मोठा आर्थिक फटका बसला आहे. महिला व बालकल्याण विभागाने कारवाई म्हणून या अपात्र पुरुष व महिला लाभार्थ्यांना योजनेच्या यादीतून वगळले आहे. मात्र, वर्षभर लाटलेल्या ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१७ ऑक्टोबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः ३८.५० क्विंटल | २,३०० | २,७६० | २,५४३ |
| ज्वारी/हायब्रिड : ९२.५० क्विंटल | २,३०० | ३,२०० | २,६४४ |
| मका/लोकलः ७.५० क्विंटल | २,२५० | २,२५० | २,२५० |
| तूर : १.५० क्विंटल | ६,१२५ | ६,१२५ | ६,१२५ |
| उडीद : २.५० क्विंटल | ४,००० | ५,२१० | ४,६०५ |
| बाजरीः ४१.०० क्विंटल | २,००० | २,८०० | २,५५८ |
| मुगः १.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| सोयाबीनः ५०९.५० क्विंटल | २,४५० | ४,१९० | ३,८८४ |
| हरभराः २.०० क्विंटल | ४,००० | ५,४०० | ४,७६६ |

cmyk

## अग्रलेख

# आनंदोत्सवातील प्रदूषण !

सध्या देशात दिवाळीची धामधूम आहे. या आनंदोत्सवाच्या सणात सर्वसामान्य माणूस होऊ दे खर्च, असे म्हणत स्वतःचं दिवाळं काढून घेत असतो. सोन्याच्या भावाने हिमालय गाठला तरी गुंजभर का होईना सोने खरेदी करण्यासाठी तो धडपडत असतो. धामधूमीच्या नावाखाली वाहन, सोने-चांदी, कपडे, मोबाईल खरेदी मोठ्या उत्साहात केली जाते. दिवाळी म्हटले की फटाके आलेच. दिवाळी आणि फटाके हे समीकरण असे काही रूढ झाले आहे की, या फटाक्यांच्या धुरामुळे होणारे दुष्परिणाम कोणाच्या लक्षातच येत नाहीत. आले तरी त्याकडे पद्धतशीरपणे दुर्लक्ष केले जाते अर्थात फटाक्यांचे आकर्षण लहान मुलांनाच अधिक असते. मुले मोठी झाली की फटाके फोडण्याचा उत्साह तितकासा राहत नाही. मुळात, फटाक्यांमध्ये आनंद शोधायचा का? असा विचार करायची वेळ आली आहे. फटाक्यांचा मोठा आवाज जे फटाके फोडतात त्यांनाही सहन होत नाही. फटाक्याची वात पेटवून ही मंडळी आपले कान बंद करून दूर उभी राहते. म्हणजेच तुम्हालाच जर आवाज सहन होत नाही तर तो इतरांना कसा काय सहन होईल?

याचा अर्थ आनंदाच्या संकल्पनेतून फटाक्यांना हद्दपार करा, फटाके फोडूच नका असा नाही. फटाके असे उडवा ज्याचा डोळ्यांना व मनाला आनंद घेता येईल, ज्यामुळे प्रदूषणही कमी होईल. यासाठी हरित फटाके हा उत्तम पर्याय आहे. फटाके फोडण्याला हरकत नाही; पण ते हरित फटाके असावेत, मोठ्या आवाजाचे नसावेत. फटाक्यांचा मोठा आवाज व धूर सहन होत नाही. आजारी व्यक्ती, ज्येष्ठ मंडळी, तान्ही मुले यांना मोठा आवाज सहन होत नाही. दिवाळीत फटाके फोडल्यामुळे कार्बन मोनाक्साईड, हायड्रोकार्बन्स, सल्फरडाय ऑक्साइड इत्यादींचे हवेतले प्रमाण प्रचंड वाढते. त्याचा परिणाम गरोदर स्त्रिया, लहान मुले आणि अस्थमाचे रुग्ण यांच्यावर सर्वाधिक होतो. या घातक वायूंची हवेतील पातळी वाढल्यामुळे घसा, नाक आणि डोळ्यांना त्रास होतो, मेंदूच्या क्षमतेवर परिणाम होतो. ज्या लोकांना हृदयरोग, श्वसनाचे विकार आणि मज्जासंस्थेचे विकार असतात, सर्दी, खोकला आणि ॲलर्जी असणाऱ्या लोकांना मोठ्या प्रमाणावर होतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाबरोबरच मोठ्या आवाजामुळे होणारे ध्वनी प्रदूषणही मोठे आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने दिलेल्या माहितीनुसार आवाजाच्या पातळीसाठी दिवसा ६० डेसिबल आणि रात्री ५० डेसिबल अशी मर्यादा आखून दिलेली आहे. फटाक्यांमुळे ही मर्यादा १४० डेसिबल्सपर्यंत जाते. ८५ डेसिबल्सपेक्षा जास्त आवाजामुळे ऐकायला त्रास होतो. आवाज वाढल्यामुळे अस्वस्थता, तात्पुरता किंवा कायमचा बहिरेपणा, उच्च रक्तदाब आणि अस्वस्थ झोप यासारख्या समस्या उद्भवू शकतात. शहरात फटाके फोडण्यामुळे होणारे ध्वनी प्रदूषण आणि हवा प्रदूषण ही गंभीर समस्या बनली आहे. देशाची राजधानी दिल्लीमध्ये दरवर्षी दिवाळीत हवेचा दर्जा कमालीचा खालावतो. यंदाही तेथील हवेची गुणवत्ता घसरली असून प्रदूषणात मोठी वाढ झाली आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक ४०० च्या वर पोहोचला आहे. प्रदूषण रोखण्यासाठी १२ कलमी कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. यात रस्त्यांची स्वच्छता, धूळ नियंत्रण, बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पाहणी, हॉटस्पॉट क्षेत्रांवर कारवाई, अखंडित वीजपुरवठा, वाहतूक नियंत्रण, जनजागृती मोहीम, खासगी वाहनांचा कमी वापर, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर भर आदींचा समावेश आहे. दिवाळीचा प्रकाश आणि रंग घराघरात आनंद घेऊन येतो; पण या आनंदाबरोबरच वाढणाऱ्या हवेतील प्रदूषणाविरुद्ध खबरदारी घ्यावी लागते. फटाक्यांच्या धुरातून, रसायनांमधून आणि सूक्ष्म धुळीतून निर्माण होणारे घटक त्वचा, डोळे आणि श्वसनसंस्थेसाठी हानीकारक ठरू शकतात. फटाके फुटल्यावर त्यातून सूक्ष्म कण आणि जड धातू हवेत पसरतात. त्यासाठी सुरक्षित अंतर आणि डोळ्यासाठी संरक्षणात्मक चष्म्याचा वापर आवश्यक आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदय व फुफ्फुसाचे आजार असलेल्या रुग्णांना प्रदूषण आणि दिनक्रमातील बदलांचा अधिक परिणाम होतो. प्रदूषणामुळे दम्याचे आणि हृदय विकाराचे त्रास वाढू शकतात. दिवसेंदिवस खालावत जाणाऱ्या हवेच्या गुणवत्तेत भर पडते ती फटाक्यांमुळे वाढणाऱ्या प्रदूषणाची, आवाजाची. निर्धारित डेसिबल मर्यादा ओलांडून जाणारा आवाज आणि धुरामुळे काळवंडून जाणारी अशुद्ध हवा भोवतालच्या वातावरणाचा गळा घोटू लागली आहे. आधीच हवेचे तीन-तेरा वाजले आहेत. हवेचा स्तर इतका खालावतो की शाळा, आस्थापने, वाहतूक काही काळ बंद ठेवावी लागतात म्हणून आनंद साजरा करण्यासाठी हरित फटाक्यांसारखे पर्याय शोधायला हवेत. हरित फटाक्यांमध्ये पोटॅशियम नायट्रेट, सल्फर हे घटक नसल्यामुळे ४० टक्के हवा आणि ध्वनी प्रदूषण कमी होते. आता जनतेनेच पारंपरिक फटाक्यांचे होणारे दुष्परिणाम ओळखून त्यांचा वापर करणे टाळले तरच प्रदूषणाला आळा बसेल. फटाक्यांची निर्मितीच कमी झाली तर दरवर्षी कारखान्यात होणाऱ्या स्फोटांचे प्रमाणही कमी होईल, जीवितहानी टाळता येईल. दिवाळी हा दिव्यांचा उत्सव. दिवाळीतील अमावस्येचा अंधार कानठळ्या बसवणाऱ्या फटाक्यांनी दूर होत नाहीच, उलट डोळ्यांसमोर काजवे चमकून सर्वत्र अंधार झाल्याचाच भास होतो. जगातील सर्वात प्रदुषित शहरांपैकी जवळपास निम्मी शहरे भारतात आहेत. राजधानी दिल्लीचा जगातील सर्वात प्रदुषित शहरांमध्ये समावेश होतो, हे नक्कीच भूषणावह नाही. दिवाळीसारख्या सणांमध्ये फटाके उडवायची परंपरा ही आनंददायी क्रिया म्हणून पाहिली जाते मात्र फटाक्यांचे मानवी आरोग्यावर व पर्यावरणावर होणारे हानिकारक परिणाम ओळखणे आवश्यक आहे. पर्यावरण संरक्षण केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता, वर्षभर जागरूकता निर्माण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. फटाक्यांना परवानगी देण्याबरोबरच, प्रदूषण रोखणे आणि कचरा व्यवस्थापन यासारख्या प्रदूषणविरोधी उपायांचा विचार करणेही आवश्यक आहे.

# बीड तालुक्यात ८४ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे ६५ कोटींची मदत जमा होण्यास सुरुवात

## घाम गाळणाऱ्याच्या हातात आता दिलासा; प्रशासनाच्या अथक प्रयत्नांना यश

बीड । प्रतिनिधी

**पिकं गेली , पण मनोबल नाही गमावलं ; कारण आशेचा दिवा प्रशासनाने पेटवला ...'' सप्टेंबर २०२५ मधील अतिवृष्टी आणि पुरामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना आता खऱ्या अर्थाने दिलासा मिळत आहे . शासनाच्या मदतनिधीचा प्रवाह जिल्ह्यात पोहोचू लागला असून , बीड तालुक्यात तब्बल ८४,३१२ शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे ६५ कोटी रुपयांची रक्कम जमा होण्यास सुरुवात झाली आहे . तहसीलदार चंद्रकांत शेळके आणि त्यांच्या टीमच्या मेहनतीला यश आले असून , रात्रीचा दिवस करून केलेल्या परिश्रमाचे फळ शेतकऱ्यांच्या बँक खात्यात पोहोचत आहे .**

प्रशासनाची सजगता आणि प्रयत्नांचा 'उजेड' या प्रक्रियेमागे अनेक अधिकाऱ्यांची संयमित मेहनत आणि समर्पण आहे . छत्रपती संभाजीनगर विभागाचे आयुक्त जितेंद्र पापळकर , बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , तसेच बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या समन्वयातून हे कार्य युद्धपातळीवर राबवण्यात आले . या सर्व अधिकाऱ्यांनी अतिवृष्टीच्या काळातच प्रत्यक्ष दौरे करून , पंचनामे तत्काळ पूर्ण करण्याचे आदेश दिले होते . '' शेतकऱ्यांना त्यांच्या घामाचे चीज मिळालेच पाहिजे'' , असा जिद्दीचा सूर प्रत्येक बैठकीत उमटत होता . परिणामी , आज बीड जिल्हा मदत वितरणात आघाडीवर ठरला आहे . आकडे बोलतात बीड तालुक्याचा गौरव राज्य शासनाच्या नुकत्याच जारी केलेल्या अहवालानुसार बीड तालुक्यातील १२२,१७० शेतकऱ्यांचे नुकसान नोंदवले गेले असून त्यापैकी ८४,३१२ शेतकऱ्यांची यादी ई पंचनामा पोर्टलवर अपलोड झाली आहे . तालुक्यासाठी प्राप्त एकूण ₹१०२ कोटींपैकी सुमारे ₹६७ कोटींची रक्कम वितरणास सुरुवात झाली आहे . अहवालानुसार बीड तालुका ७० % अपलोड



टक्केवारीसह वेगाने काम करत आहे . शेतकरी आयडी , आधार क्रमांक किंवा बँक खात्याची माहिती पूर्ण होताच एकूण ₹१०२ कोटींची मदत पूर्णपणे वितरित होणार आहे . तहसीलदार शेळके यांचा उत्साह : '' एकही शेतकरी वंचित राहणार नाही'' तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी या प्रक्रियेत विशेष नेतृत्व केले आहे . त्यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल आणि कृषी विभागातील कर्मचारी रात्री उशिरापर्यंत संगणक प्रणालीवर डेटा तपासत आहेत . शेळके म्हणाले , ''शेतकऱ्यांचे अश्रू आम्हाला झोप येऊ देत नव्हते . आता त्याच शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद म्हणजे आमच्यासाठी खरी दिवाळी आहे .'' उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांचा समन्वय उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी प्रशासनातील विविध पातळ्यांवर समन्वय साधून डी बी टी प्रणालीत पारदर्शकता राखली . ''सरकारचा पैसा योग्य ठिकाणी , योग्य वेळी पोहोचला पाहिजे'' , हा त्यांचा स्पष्ट आग्रह होता . त्यांचे मार्गदर्शन आणि महिलांच्या नेतृत्वाचा आत्मविश्वास महसूल कर्मचाऱ्यांना उर्जित ठेवणारा ठरला . अद्याप कागदपत्रे अपूर्ण असणाऱ्यांसाठी आवाहन प्रशासनाने जाहीर केले आहे की ज्या शेतकऱ्यांनी अद्याप फार्मर आयडी , आधार कार्ड किंवा बँक खात्याचा क्रमांक ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडे सादर केलेला नाही , त्यांनी तात्काळ ती माहिती द्यावी . कारण या माहितीशिवाय मदतनिधी खात्यात जमा होऊ शकत नाही . ''आशेचा किरण प्रशासनाच्या डोळ्यांतून'' अतिवृष्टीच्या पावसाने पिकं वाहून गेली , पण प्रशासनाच्या प्रयत्नांनी आशेची पेरणी पुन्हा झाली आहे . ''अंधारात ज्योत विझत नाही , जर ती लोकसेवेने पेटवली असेल तर ...'' हीच भावना प्रत्येक महसूल कर्मचाऱ्याच्या चेहऱ्यावर दिसत आहे .

# टेबल टेनिस स्पर्धेत सौ. के.एस.के महाविद्यालयाला उपविजेते पद

बीड । पतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व बलभिम महाविद्यालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतर महाविद्यालयीन टेबल टेनिस स्पर्धेमध्ये सौ. के.एस.के महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विद्यापीठाचे उपविजेते पद प्राप्त केले. बक्षीस वितरणा समयी विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा संचालक डॉ. सचिन देशमुख, डॉ. दयानंद कांबळे, आयोजन समितीचे डॉ. तत्तापुरे, विद्यापीठ क्रीडा मंडळाचे सदस्य डॉ. वनगुजरे तसेच डॉ. पंकज दिखत या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते उपविजेते पदाचा चषक संघातील खेळाडू कु. मयुरी मानुरकर, कु. हर्षदा उबाळे, कु. सुजाता जोशी, कु. गायत्री जोशी क्रीडा संचालक डॉ. भागचंद सानप, मार्गदर्शक



श्रीकांत व्यवहारे यांनी स्विकारला.

खेळाडूंच्या या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संस्थेचे अध्यक्ष डॉ. किशोर काळे, संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. दीपा क्षीरसागर, माजी नगराध्यक्ष डॉ. भारतभुषण क्षीरसागर, संचालक डॉ. सारीका क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. सुधाकर गुट्टे, डॉ. विश्वांभर देशमाने, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळाणकर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, कमविचे उपप्राचार्य नारायण काकडे, पर्यवेक्षक श्री जालिंदर कोळेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. भागचंद सानप, अमृतसिंग बिसेन, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

# राष्ट्रीय भौतिक-गणितीय ज्ञान स्पर्धेत सौ. के.एस.के महाविद्यालयाच्या पुजा घोलपचा द्वितीय क्रमांक

बीड । प्रतिनिधी

येथील सौ. के.एस.के. महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु. पुजा घोलप ने मिल्लिया महाविद्यालयातील गणित व भौतिकशास्त्र विभागामार्फत घेण्यात आलेल्या १४ व्या राष्ट्रीय फिजीक्स - मॅथेमॅटीक्स नॉलेज टेस्ट स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. यास्पर्धेमध्ये देशभरातील विविध महाविद्यालयातील जवळपास १०५ विद्यार्थ्यांनी सहभाग



नोंदवला होता. यास्पर्धेचे आयोजन दोन टप्यात करण्यात आले होते. नुकताच या स्पर्धेचा निकाल घोषीत करण्यात आला.

या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव मा. डॉ. दिपा क्षीरसागर यांच्या हस्ते कु. पुजा घोलप हीचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव डॉ. योगेश क्षीरसागर, संचालिका डॉ. सारीका क्षीरसागर , संस्थेचे प्रशासक डॉ. व्ही. टी. देशमाने, डॉ. एस.एल.गुट्टे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील देवळानकर, डॉ. अनिता शिंदे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर, उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. ए.एस.खान, गणित विभाग प्रमुख डॉ. शंकर राउत, डॉ. पद्माकर ससाणे, डॉ. डोंगरे यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

## पान १ वरून...

### राज्यात शंभर टक्क्यांहून अधिक

स्थिती आहे. राज्यात सप्टेंबरच्या अखेरीस अधिक पाऊस झाल्याची नोंद झाली. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भातील अनेक धरणे भरली आहेत. तर काही धरणांतून पाण्याचा विसर्ग सोडण्यात आला होता. तो अजूनही सुरू आहे. यंदा मे अखेरीस झालेल्या मुसळधार पावसामुळे भूजल पातळीत काहीशी वाढ होऊन धरणांतही आवक सुरू झाली होती. मुसळधार पावसामुळे मे मध्येच शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात आशा पल्लवित झाल्या होत्या. अनेक शेतकऱ्यांनी नियोजन करत पेरण्या केल्या होत्या. मात्र, त्यानंतर मध्य महाराष्ट्राचा पूर्व भाग, खानदेश, मराठवाडा व विदर्भात पुरेसा पाऊस न झाल्याने त्याचा परिणाम सुरुवातीचे दोन महिने पेरण्यांवर झाला. तर ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये झालेल्या अति पावसाचा परिणाम पिकांच्या नुकसानीवर झाला. यंदा मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांत पावसाने जोरदार हजेरी लावली. प्रामुख्याने सप्टेंबरच्या पावसाने चांगलाच धुमाकूळ घातल्याने सर्वच जिल्ह्यांत पावसाने सरासरी ओलांडली. यामध्ये छत्रपती संभाजीनगरमध्ये १४१ टक्के, जालना १३८, बीड १६०, लातूर १३१, धाराशिव १६१, नांदेड १३६, परभणी १२१, हिंगोली १४१ टक्के पाऊस पडला.

------------

### पोलीस स्मृतिदिनानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस

संदेश वाचनातून गेल्या वर्षभरात देशात हौतात्म्य प्राप्त झालेल्या ३४ पोलीस अधिकारी व १५७ पोलीस अंमलदार अशा एकूण १९१ वीर शहीदांना त्यांच्या अतुलनीय बलिदानाबद्दल श्रद्धांजली वाहिली. यावेळी शहीद झालेल्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदारांची नावे वाचनानंतर पोलीस बँड पथकाद्वारे सलामी शस्त्र धून वाजविण्यात आली. तसेच गणवेशधारी अधिकारी व जवानांनी सलामी दिली. पोलिसांतर्फे अभिवादन म्हणून बंदुकीच्या तीन फैरी झाडण्यात आल्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी निमंत्रित देश-विदेशी पाहुणे, वरिष्ठ पोलीस अधिकारी व हुतात्म्यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली.

---------

### शेतकऱ्यांना नुसते आश्वासन

कसरत मनोज जरांगे पाटील यांनी केली. त्यांनी मंत्री छगन भुजबळांवर टीका केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर बोलताना पाटील म्हणाले, दीपावली आणि पाडव्याचे दोन-तीन दिवस जाऊ द्या त्यानंतर शेतकरी तज्ञ अभ्यासक यांना आम्ही फोन करणार आहोत. शेतकऱ्यांसाठी कशा स्वरूपाने पुढे जायचं यासाठी कर्जमुक्तीसाठी नुकसान भरपाई पैसे या सगळ्या गोष्टींच्या संदर्भात काय करायचं. त्यासाठी सगळ्या पक्षात असलेले सुद्धा आम्ही बोलवणार आहोत. सध्या शेतकऱ्यांचा संसार उध्वस्त झाल्याने वाईट दिवाळी आलेली आहे, त्यामुळे कशीतरी आता करावी लागणार आहे.ङ्गसोयाबीन कापूस विकल्यानंतर कसे तरी दोन घास आम्ही लेकरांना गोड देणार होतो मात्र तसं काही करता आलं नाही. याचा बदला आपल्याला घ्यावा लागणार आहे या नेत्यांची खूप फरफट आपल्याला करावी लागणार आहे, यांचे कपडेच आढावा लागणार आहे तेव्हा हे ठिकाणावर येतील असा देखील इशारा जरांगे पाटलांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवरून सरकारला दिला.ङ्गङ्गयावेळी बबनराव तायवाडे यांच्याकडे रोख ठेवत मराठा-कुणबी जीआर रद्द करायची आणि त्याला हात लावायची कोणाचीही टप्पर नाही. आम्ही मराठी कशाला आहोत? तुम्हाला वाटत असेल एकीकडून ओबीसीला खुश करायचं, दुसरीकडे मराठ्यांना सुद्धा सांगायचं की तुम्हाला जीआर दिला मात्र प्रमाणपत्र केव्हा वाटप करायला सुरुवात करणार आहे असा देखील सवाल जरांगे यांनी उपस्थित केला. तात्पुरत्या आनंदात जगणारा माणूस जरंगे पाटील नाही, असे ते म्हणाले.ङ्गमी बबनराव तायवाडे यांच्यावर आतापर्यंत बोललोच नाही, परंतु त्या माणसाची आता मला कीव यायला लागलेली आहे कारण की तुम्हाला आता ते इतके घाण घाण बोलू लागले आहेत तरीपण तुम्ही तिकडचे वाटता असा देखील हल्लाबोल जरांगे पाटलांनी बबनराव तायवाडे यांच्यावर केला. मला आत्ता सात आठ दिवसापूर्वी माहीत झाला की ते कुणबी आहेत म्हणून त्यामुळे कुणबी मराठा एकच आहे. तुम्हाला किती घाण बोलतात ते असल्या लोकांना लाथा खाली तुडून काढलं पाहिजे असा सल्ला देखील जरांगे यांनी बबनराव तायवाडे यांना दिला.तुम्हाला या वयात किती घाण घाण बोलत आहे तुम्ही त्यांना लाथाने ठोकलं पाहिजे. ज्याला कुत्रही विचारत नाही त्यांचे बोलणे तुम्ही खायला लागलात असं म्हणत नाव न घेता ओबीसी नेत्यांवर हल्लाबोल केला. ज्या ठिकाणी बीडमध्ये सभा झाली त्याच ठिकाणी आमची घोंगडी बैठक झाली. त्यामुळे चंद्रशेखर बावनकुळे बोलतात त्यामध्ये चूक काय? बरोबर आहे. त्यांना सरकार मध्ये राहून देवेंद्र फडणवीस यांना डॅमेज करायचं आहे, कारण मराठ्यांचं आणि फडणवीसंच कुठेतरी आता जुळलेलं आहे असे जरांगे म्हणाले. कुणबी आरक्षणाला नाही धक्का लागत कारण ओबीसी आधी आम्हीच आहोत, तुम्ही आता आलेले आहेत मी दीडशे दोनशे वर्षांपासून आहे धक्का लागू देणार नाही, असे जरांगे म्हणाले.

-------------

### धाराशिवमध्ये दोन कारच

चार जणांचे मृतदेह ताब्यात घेऊन पोस्टमार्टेमसाठी पाठवले आहेत.पोलिसांकडून अपघातामधील मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. प्राथमिक माहितीनुसार, या भीषण अपघातात मृत्यू झालेले चारही जण बिदर येथील होते. तर जखमी झालेले दोन जण सोलापूर येथील आहेत. त्यांच्यावर सोलापूरमधील सिव्हिल रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. गाडी चालवताना कुत्रे आडवे आल्याने कुत्र्याला वाचवताना अपघात झाल्याची माहिती मिळाली आहे.अपघातात मृत्यू झालेले ४ जण धाराशिव जिल्ह्यातून आज सकाळी खासमपूर बिदरकडे जात होते. त्यावेळी काळाने घाला घातला. दिवाळीच्या उत्सवात हे चार जण बिदरला अतिशय वेगाने जात होते. त्यावेळी सोलापूर-हैदराबाद महामार्गावर डाळिंब गावाजवळ अचानक कुत्रा आडवा आला. कुत्र्याला वाचवण्यासाठी चालकाने ब्रेक दाबला. वेगात असलेली गाडी डिव्हायडर तोडून विरोधी दिशेने जाणा-या रस्त्यावर गेली. त्यावेळी समोर आलेल्या दुस-या गाडीला जोरात धडक झाली. समोरून येत असणारी ग्रँड वितारा ही गाडीही अतिशय वेगात होती. कुत्र्याला वाचवायला गेलेल्या सफारी गाडीचा अपघात झाला. यात चौघांचा मृत्यू झाला.

----------

### एका वर्षात दोनवेळा

घेतली जाईल. यंदा पाचवी आणि आठवी यांच्यासाठीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन फेब्रुवारी २०२६च्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या रविवारी घेण्यात येईल. चौथी आणि सातवी या वर्गांसाठीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन साधारणतः एप्रिल किंवा मे महिन्यात केले येईल. २०२६-२७ या शैक्षणिक सत्रापासून पुढे इयत्ता चौथी आणि इयत्ता सातवीसाठी नियमितपणे शिष्यवृत्ती परीक्षेचे आयोजन करण्यात येईल. चौथ्या वर्गासाठी प्रतिवर्षी पाच हजार रुपये तर सातवीसाठी प्रतिवर्षी ७ हजार ५०० रुपये शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येणार आहे. पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचे नाव आता अनुक्रमे प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा असे करण्यात येणार आहे.आता पाचवीऐवजी चौथी व आठवीऐवजी सातवीची परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेकरिता शासनमान्य शाळांमधील विद्यार्थी परीक्षा देण्यास पात्र राहतील. सीबीएसई, आयसीएसई आणि इतर अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळांमधील विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती परीक्षेला बसण्यासाठी विशिष्ट नियमांच्या आधारे परवानगी दिली जाईल.

--------

### ऐसा कोई सगा नही, जिसे भाजपने ठगा

त्यांनी स्पष्ट केले. ''ऐसा कोई सगा नाही, जिसे भाजपने ठगा नाही, अजित पवार हे भाजपपुढे किस खेत की मूली आहेत,'' असे म्हणत राऊत यांनी भाजप आणि अजित पवार यांच्यावर संबंधावर निशाणा साधला. राजकारणामध्ये तुम्ही एकमेकांवर कितीही टीका केली तरी संकटकाळी सह्याद्रीच हिमालयाच्या मदतीला जातो. शरद पवार देशाचे कृषिमंत्री, संरक्षणमंत्री होते. त्यांनी केलेले काम, त्यांचा अनुभव आणि आजही आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे असलेले संबंध यांचा उपयोग शेवटी केंद्र सरकारलाच करून घ्यावा लागतो. ही परंपरा आहे. नरेंद्र मोदी यांना ज्या दोन प्रमुख लोकांनी मदत केली त्यामध्ये शरद पवार आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे हे अग्रस्थानी आहेत. मी माझ्या पुस्तकातही हे लिहिले आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राच्या नेत्यांनी मदत केली; पण या मदतीचे पांग कसे पडले हे सुद्धा आपण पाहिले, असेही संजय राऊत म्हणाले.

**उद्धव ठाकरे २७ ऑक्टोबरला घेणार उपशाखाप्रमुखांचा मेळावा**

''भ्रष्टाचार आणि पैशाचा अतिरेकी वापर करून काहीजण महाराष्ट्र आपल्या हातात ठेवू इच्छित आहेत; पण आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष माननीय राज ठाकरे हे महाराष्ट्र विचाराने आणि संघटनात्मक बांधणीच्या माध्यमातून ढवळून काढणार आहेत. १ नोव्हेंबर रोजी मतदार यादीतील घोळाविरोधात काढण्यात येणाऱ्या सर्वपक्षीय मोर्चामध्ये शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मोठे योगदान असेल. मोर्चा विराट होईल. उद्धव ठाकरे उपशाखाप्रमुखांचा मेळावा मुंबईत २७ ऑक्टोबर रोजी घेणार आहेत,'' अशी माहितीही संजय राऊत यांनी दिली.

**मुस्लिम या देशातला मतदार नाही का?**

''मुस्लिम या देशातला मतदार नाही का?'' असा सवाल करत, ''आम्हाला जे मतदान करणार आहेत त्यांनाच मतदानाचा अधिकार देऊ, असा कायदा नरेंद्र मोदी यांनी करावा. या देशात हिंदू, मुस्लिम, पारशी, शीख, जैन आणि ख्रिश्चन हे सर्व मतदार आहेत. फक्त भारतीय जनता पक्षाला मत देतात तेच मतदार हा जर तुमचा अजेंडा असेल, तर तुम्ही पार्लमेंटमध्ये त्यासाठी बिल घेऊन या, आम्ही चर्चा करू,'' असे आव्हानही त्यांनी केंद्र सरकारला दिले.

----------

### रेशनकार्ड धारकांना

केंद्र सरकारच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत राज्य सरकारला भरडधान्य खरेदी करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. त्यानुसार, २०२४-२५ या हंगामात ज्वारीचे अतिरिक्त उत्पादन झाल्याने राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर ज्वारी खरेदी केली. या खरेदी केलेल्या ज्वारीचा प्रभावी वापर व्हावा, यासाठी सरकारने ती रेशन दुकानांमार्फत मोफत वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या ज्वारीला योग्य बाजारपेठ मिळेल आणि गरजू कुटुंबांना पौष्टिक अन्नधान्याचा पुरवठा होईल.

-----------

### मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण

या पैशांच्या वसुलीसंदर्भात अद्याप कोणतीही ठोस कारवाई किंवा पाऊले उचलली गेली नसल्याचे उघड झाले आहे. यापूर्वी सरकारी कर्मचारी महिलांचा समावेश आणि २४०० पुरुष लाभार्थ्यांनी लाभ घेतल्याचे उघड झाले होते. सध्या राज्यात २.४१ कोटी महिला या योजनेचा लाभ घेत आहेत. सुरुवातीच्या पडताळणीत २६ लाख ३४ हजार संशयित लाभार्थ्यांना अपात्र ठरवण्यात आले होते, तर ई-केवायसीमुळे हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे. या मोठ्या फसवणुकीची चौकशी सुरू असून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होण्याची शक्यता आहे.

cmyk

## अतिवृष्टी,पुर परिस्थितीमुळे दीवाळी निमित्त माजी आ.भीमराव धोंडे यांचा स्नेह फराळाचा कार्यक्रम रद्द

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी,पाटोदा,शिरूर का.विधानसभा मतदार संघातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक यांच्यासाठी दरवर्षीप्रमाणे दीपावलीच्या शुभ पर्वानिमित्त फराळ कार्यक्रम आयोजित केला जात असतो परंतु यंदा झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी व व्यापारी बांधवांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.या परिस्थितीमुळे यंदाचा दीपावली स्नेह फराळाचा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे अशी माहिती युवानेते डा. अजयदादा धोंडे यांनी दिली.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. २२ ऑक्टोबर २०२५



# प्रियदर्शनी क्रीडा मंडळाच्या वतीने स्वारातीमधील रुग्ण व नातेवाईकांच्या चेहऱ्यावर हसू फुलवत दिवाळी केली गोड

## राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णांच्या नातेवाईकांना दीपावली फराळ वाटपाचे हे ३८ वे वर्ष

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल असलेले रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची देखील दिवाळी गोड व्हावी व त्यांच्या चेहऱ्यावर समाधान व हसू फुलावे ही सामाजिक भावना जोपासत राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शन तथा नेतृत्वाखाली प्रियदर्शनी क्रीडा व सांस्कृतिक मंडळाच्या वतीने रुग्णाच्या नातेवाईकांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न केला आहे. अंबाजोगाई शहरातील प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक आणि व्यायाम मंडळाने सलग ३८ व्या वर्षी स्वा रा ती मधील रुग्णांना दीपावलीच्या निमित्ताने फराळ वाटपाचे सामाजिक उत्तरदायित्व जोपासले आहे. दि २० ऑक्टोबर दीपावलीच्या पहिल्या दिवशी म्हणजेच नरक चतुर्थीच्या दिवशी सकाळी ९ वाजता स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रूग्णालय येथील रूग्णांना प्रियदर्शनी सांस्कृतिक मंडळाचे संस्थापक सचिव राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी त्यांच्या अनेक**



**सहकाऱ्यांच्या उपस्थितीत दिवाळी फराळ वाटप केला .यावेळी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे, वैद्यकीय अधीक्षक डॉ राकेश जाधव , श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ नागेश अब्दागिरे ,ॲड विष्णुपंत सोळंकी, मनोज लखेरा, महादेव आदमाणे, डॉ राजेश इंगोले, खालेद चाऊस , माणिक वडवणकर यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.**

गेल्या ३८ वर्षापासून आजपर्यंत अखंडीतपणे स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना दिवाळी फराळ वाटपाची परंपरा प्रियदर्शनी क्रीडा मंडळाची आहे. आपण दीपावलीच्या सणापासून कुठेतरी दूर आहोत अशी भावना रूग्णांची व नातेवाईकांची होवू नये या सामाजिक दायित्वातून तसेच रुग्ण व नातेवाईक यांची रुग्णालयातील आजारपणाच्या मानसिकतेतून त्यांना बाहेर काढून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याची परंपरा मंडळाने सुरू केलेली आहे. दीपावली निमित्त फराळ वाटपात गेली ३८ वर्ष सातत्य टिकवलेले आहे. राजकिशोर मोदी यांनी १९८९ साली प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतीक व व्यायाम मंडळाची स्थापना केली. तेंव्हाच्या सर्व तरूण सहकार्यांनी एकत्र येवून मंडळामार्फत विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम , विविध स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प केला होता . त्याचाच एक भाग म्हणून स्वा रा ती येथील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी हा दिवाळी फराळ वाटपाचा कार्यक्रम सुद्धा सुरू केला. ज्याचा सकारात्मक परिणाम हा रुग्ण व रूग्णांचे नातेवाईक यांच्यावर झाल्याचे पहावयास मिळत आहे.

राजकिशोर मोदी हे सातत्याने वेगवेगळ्या घटक व विविध विषयांवर काम करत आहेत. ज्यामध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी बालझुंबड , महारक्तदान शिबीर, गरजूंना अन्नधान्य वाटप, कोरोना योद्धा सन्मान, निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी वॉकेथॉन ही व अशी अनेक सामाजिक , शैक्षणिक व सांस्कृतिक कार्य सातत्याने सुरू असून याकामात त्यांना त्यांच्या सर्व सहकार्यांचे पाठबळ मिळत आहे. म्हणूनच हा उपक्रम आजतागायत अविरतपणे सुरू असल्याचे यावेळी राजकिशोर मोदी यांनी सांगितले. दिवाळी फराळ वाटप करत असताना रूग्णांना दीपावलीच्या शुभेच्छा देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद देण्याचे काम देखील राजकिशोर मोदी आणि त्यांचे सहकारी करत आहेत. या फराळ वाटपाच्या कार्यक्रमास माजी नगरसेवक अमोल लोमटे , दिनेश भराडीया, धम्मा सरवदे, प्रा शैलेश जाधव , सुनील वाघाळकर , गणेश मसने, कचरू सारडा,नाजेम भाई, चंद्रकांत महामुनी, अशोक देवकर, पंडित हुलगुंडे, सुभाष पाणकोळी ,काझी खायमिद्दीन, अकबर पठाण, खलील जाफरी, राजू मोरे, सय्यद रशीद, ॲड दयानंद लोंढाळ, ॲड मिर्झा, विश्वजित शिंदे, अनिस भाई, रफिक गवळी, सुशील वाघमारे,दत्ता सरवदे, गोविंद पोतंगले, खलील जाफरी, अंकुश हेडे, सय्यद ताहेर, सचिन जाधव , जावेद गवळी, विशाल पोटभरे, आकाश कऱ्हाड, महेश कदम, मतीनं जरगर , भीमसेन लोमटे , भीमसेन लोमटे, संतोष चिमणे, शुभम लखेरा,जमादार पठाण,दौलत मिरखान, इम्रान भाई, अहमद गवळी, शाहिद शेख, महेबूब गवळी, विशाल जगताप , अजीम जरगर , गोविंद टेकाळे, शुभम लखेरा, रोहन कुरे, रोहित देवकर, जावेद भाई आदीसह प्रियदर्शनी क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे सहकारी राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि राजकिशोर मित्र मंडळाचे सर्व सहकारी सदस्य उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिकांना कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनाचे कीट वाटप

नांदेड । प्रतिनिधी

दीपावलीच्या मंगल मुहूर्तावर देगाव येथे १११ नागरिकांना भारत सरकारच्या राष्ट्रीय योजना अंतर्गत भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम (अलिमको ) ते कृत्रिम अवयव साहाय्यभूत साधनांचे वाट करण्यात आले. समाजसेवेची भावना जोपासत या उपक्रमाचे अजून डॉक्टर दत्ता मोरे यांच्या पुढाकार्याने करण्यात आले. गुडघेदुखी, पाठ दुखी, चालताना न येणे अशा विविध व्याधीग्रस्त नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ऑपरेशन न करता चालण्यायोग्य व दैनंदिन जीवन सुरत करणारी किट



वाटप केली. कार्यक्रमात शेतकरी शेतमजूर पंचायत राज्याध्यक्ष बळवंतराव मोरे, राव साहेब मोरे, मोहनराव अडकिने, माजी सरपंच उत्तम मोरे, साईनाथ घोडके, राहुल गायकवाड, शुभम भद्रे, , ज्ञानेश्वर के. चव्हाण रामराव आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत अधिकारी मोहनराव अडकिने, लिपिक योगेश पुंड, सेवक सलमान शेख, समीर पठाण आणि सुधाकर मामा यांनी परिश्रम घेतले. देश नागरिकांचा सन्मान म्हणजेच खऱ्या अर्थाने देश नागरिकांचा सन्मान म्हणजेच खऱ्या अर्थाने दीपावलीचा प्रकाश असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. डॉ. दत्ता मोरे यांच्या सामाजिक उपक्रमास सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# मोठेवाडी येथे शॉर्टसर्किटमुळे ऊस जळून खाक



## शेतकरी त्रिंबक यादव यांचे मोठे नुकसान

माजलगाव । प्रतिनिधी

गट क्रमांक २६६ येथील शेतातील ऊस लागवडीला सोमवारी रात्री अचानक लागलेल्या आगीमुळे मोठे नुकसान झाले आहे. या आगीत त्रिंबक म्हातरबा यादव व बाबासाहेब त्रिंबक यादव या शेतकऱ्यांचा ऊस जळून खाक झाला. शॉर्टसर्किटमुळे ही घटना घडल्याचे प्राथमिक निष्पन्न झाले असून संपूर्ण उसाचा पट्टा काही मिनिटांत ज्वाळांच्या विळख्यात सापडला. रात्रीच्या सुमारास अचानक धुराचे लोट व ज्वाळा दिसताच शेतकरी व गावातील तरुण मदतीला धावले. पाण्याची उपलब्धता कमी असल्याने आग वेगाने पसरत गेली. ऊस पिकाचे वाढते वाऱ्यामुळे ज्वाळा अधिक भडकल्या आणि मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न केला असला तरी तोपर्यंत उसाचा मोठा भाग जळून राख झाला.

या आगीत शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून, महसूल व वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी तातडीने पंचनामा करून शेतकऱ्याला योग्य नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.ऊस हाच पिकाचा मुख्य आधार असताना, आगीत संपूर्ण हंगामाचा आशादेखील भस्मसात झाल्याची खंत यादव कुटुंबाने व्यक्त केली.

# कोरोना झाल्याचे सांगून चुकीचा उपचार

## अहिल्यानगरच्या डॉक्टरचा प्रताप

अहिल्यानगर । प्रतिनिधी

कोरोना काळात चुकीचा रिपोर्ट बनवणे, मर्जीविरोधात रुग्णालयात दाखल करून ठेवणे, आणि मृतदेहाची परस्पर विल्हेवाट लावणे या आरोपाखाली गुन्हा दाखल असलेल्या अहिल्यानगरच्या डॉक्टरांचा अटकपूर्व जामीन जिल्हा न्यायालयाने फेटाळला आहे. खासगी रुग्णालयाचे डॉ. गोपाळ बहुरूपी आणि डॉ. सुधीर बोरकर असे त्या डॉक्टरांची नावे आहेत.

डॉ. गोपाळ बहुरूपी आणि डॉ. सुधीर बोरकर यांनी यांनी अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र दोन्ही पक्षाच्या युक्तिवादानंतर कोर्टाने अटकपूर्व जामीन फेटाळला आहे.

कोरोना झाल्याचे भासवून ७९ वर्षीय वृद्धावर चुकीचे उपचार केले, त्यामुळे त्या वृद्धाचा मृत्यू झाल्याचा आरोप मृताच्या मुलाने केला होता. मृत बबनराव खोकराळे यांच्या मुलगा अशोक खोकराळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात पाच डॉक्टरांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एसटी आरक्षणासाठी मागितला दिवाळी मेरा!

## बंजारा समाजाची दिवाळी रस्त्यावर



जालना । प्रतिनिधी

बंजारा समाजाला एसटी आरक्षण लागू करावे या मागणीसाठी पाच दिवसापासून आमरण उपोषण करत असलेले विजय चव्हाण यांच्या समर्थनार्थ जालना शहरात बंजारा समाजाने मंगळवारी ( ता.२१) रस्त्यावर चुली मांडून स्वयंपाक केला.उपोषण स्थळापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत रॅली काढून मुलींनी ''वरसे दनेरी कोट दिवाळी ! मुख्यमंत्री तो न मेरा !!'' असे गाणे गात मुख्यमंत्र्यांकडे एसटी आरक्षणासाठी दिवाळीचा मेरा मागितला.शासनाने दखल न घेतल्यास मुंबईत येऊन आरक्षणाचा मेरा मागितला जाईल असा इशारा देण्यात आला.

अंबड चौफुली जवळील राष्ट्रमाता, महाराणी अहिल्यादेवी होळकर स्मारक परिसरात विजय चव्हाण यांचे आमरण उपोषण सुरू असून दिवसेंदिवस त्यांची प्रकृती खालावत आदरणीय चालली आहे . शासन, प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने बंजारा समाजाने दिवाळी साजरी न करता रस्त्यावर स्वयंपाक करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

सायंकाळी ०५.०० वा.महिलांनी अंबड चौफुली जवळील रस्त्यावर चुल मांडून पातळी बाटी,गलवाळी, हे पदार्थ केले.स्वयंपाकानंतर समाज बांधवांनी पारंपरिक वेशात वाजत -गाजत जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत रॅली काढली.यावेळी मुलींनी गीत गाऊन मुख्यमंत्र्यांकडे आरक्षणासाठी दिवाळीचा मेरा मागितला. जिल्हा प्रशासनास मुली व महिलांनी निवेदन देले. हैद्राबाद गॅझेट च्या आधारे बंजारा समाजाला एसटी आरक्षण लागू करावे, आरक्षण लढाईत प्राणांची आहुती देणाऱ्या समाज बांधवांच्या कुटुंबांना २५ लक्ष रुपये मदत देऊन कुटुंबांतील एका सदस्यास शासकीय नोकरी द्यावी आदी मागण्यांचा समावेश आहे.यावेळी मुली, महिला, समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# राक्षसवाडी ग्रामस्थांना स्वामी विवेकानंद शाळेचा मदतीचा हात देत जागवल्या सामाजिक जाणिवा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**(दि. १७ ऑक्टो. अंबाजोगाई) स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर अंबाजोगाई शाळेत स्वरमंजिरी – संगीत संध्या हा दिवाळीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील मुला–मुलींनी विविध कलागुणांचे प्रदर्शन केले. या कार्यक्रमास शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमावेळीच राक्षसवाडी येथील पूरग्रस्त शेतकरी बांधवांच्या दुःखात सामील होत स्वामी विवेकानंद शाळेकडून मदतीचा हात म्हणून दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे किट वाटप करण्यात आले. शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी यांनी मदतीचा हाथ पुढे करत एकूण ४०००० रुपयांचे धान्य वाटप केले.**




काल नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित, स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळेमध्ये स्वरमंजिरी संगीत संध्या हा कार्यक्रम दिवाळीनिमित्त आयोजित करण्यात आला होता. शाळेच्या दीपोत्सव या कार्यक्रमाची परंपरा मोठी आहे. यावर्षीचे दीपोत्सवाचे १९वे वर्ष होते. प्रथेप्रमाणे दरवर्षी इयत्ता चौथीतील मुले दिवाळीसाठी शाळेमध्ये येऊन राहतात व दिवाळी साजरी करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व विद्यार्थी पहाटेच उठून व्यायाम, उपासना व अभ्यंगस्नान करतात. यावर्षी सकाळच्या सत्रात वाचन प्रेरणा दिनानिमित्ताने अंबाजोगाईतील साहित्य निकेतन ग्रंथालय व शाळेच्या संयुक्त विद्यमाने शाळेमध्ये सामूहिक पुस्तक वाचनाचा कार्यक्रम पार पडला. संध्याकाळी मुलांमधील विविध कलागुणांना वाव देण्यासाठी स्वरमंजिरी – संगीत संध्या हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी इयत्ता तिसरी ते सातवीतील विद्यार्थ्यी व संगीत शिक्षिका श्रीमती श्रीदेवीताई पवार यांच्या गटाने विविध रागातील सुरेल अशी समूहगीते सादर केली. कु. आस्था हिने बहारदार नृत्य सादर केले, शहरातील प्रसिद्ध बासरीवादक श्री. भागवत पाठक यांच्या बासरीवादनाचा कार्यक्रम झाला त्यांना श्री. रत्पदीप शिगे यांनी तबल्यावर साथ दिली. श्री. सुभाष शेप व श्री. आसाराम जोशी यांनी सुंदर गीते सादर केली. सर्वात शेवटी चि. अभिमन्यू कुलकर्णी याने क्लासिकल व पाश्चिमात्य संगिताचे मिलाफ दर्शवणारे (फ्युजन तबला वादन) सादर केले.

शाळा नैतिक मूल्य, संस्कार रुजवणारे व सुसंस्कृत जीवनशैलीचा आदर्श घालून देणारे केंद्र असते. स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर शाळा अशाच समाज व देश घडवण्याच्या आदर्शांवर चालणारी शाळा आहे. असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी व प्राध्यापक आदरणीय श्री मुकुंद राजपंखे सर यांनी केले व शाळा रुजवत असलेल्या संस्कारांचे भरभरून कौतुक केले

या कार्यक्रमास नवक्षितीज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती स्वरूपाताई डिग्रसकर, संस्थेचे सचिव श्री. संतोष दादा कुलकर्णी तसेच प्रमुख अतिथी म्हणून श्री. प्रसाद (दादा) कुलकर्णी (गायक) श्रीमती हेबाळकर बाई (खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका, रा. स्वंयसेविका, दिनदयाळ बँकेच्या संचालिका), डॉ. राजेश इंगोले सर (डॉ. मानसोपचार तज्ज्ञ), ॲड. मकरंद पत्की (दिनदयाळ बँकेचे अध्यक्ष), डॉ. अतुल देशपांडे (माजी नगरसेवक (भाशिप्र)

चे कार्यवाहक), प्रा. राजपंखे सर (प्रसिद्ध, कवी, गझलकार), श्रीमती रोहिणी पाठक मॅडम ( अध्यक्षा, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या) , स्वामी विवेकानंद शाळेतील शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्रीमती निशीगंधाताई जोगदंड, निवेदन कु. वेदिका माले व कु. श्रावणी माहूरकर तर आभारप्रदर्शन श्री. उल्हास दादा रामदासी यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्वामी विवेकानंद परिवाराने कष्ट घेतले.

# श्रीक्षेत्र शनी मंदिरात दिवाळी पाडव्याचे औचित्य साधून भव्य कवी संमेलनाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

दिवाळी पाडवा सणानिमित्त बीड शहरातील काव्यप्रेमींसाठी आनंदाची बातमी आहे. श्रीक्षेत्र शनी मंदिर देवस्थान, बीड येथे दिनांक २२ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ७ वाजता भव्य कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनात शहरातील नामवंत कवी सहभागी होऊन आपल्या भावकवितांद्वारे दिवाळीच्या उत्सवी वातावरणात रसिकांना विचारांची, हास्याची आणि प्रेरणेची मेजवानी देणार आहेत. या कवी संमेलनात कवी श्रीकृष्ण उबाळे, संतोष डोंगरे, पंजाबराव येडे, बापूसाहेब शिंदे, दादासाहेब सादोळकर, सुधाकर राठोड, दत्तू वारे, छायाताई खोसे यांच्यासह अनेक प्रतिष्ठित कविजन आपले सुमधुर काव्य सादर करणार आहेत. श्रीक्षेत्र शनी मंदिर देवस्थान समितीने या उपक्रमाचे आयोजन दिवाळीच्या प्रकाशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर केले असून, कवितांमधून प्रकाश, हास्य आणि विचारांचा दीप उजळवण्याचा हा मुख्य हेतू असल्याचे समितीने सांगितले. या अनोख्या काव्य संमेलनाचा आस्वाद घेण्यासाठी शहरातील सर्व काव्यप्रेमी, भक्त आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे. दिवाळीचा उत्सव कवितेच्या सुरांनी सजणार – शनी मंदिरात काव्यरसिकांसाठी खास पर्व!

cmyk

# केंद्र सरकार काढणार दुधाळ पशुधनाचा विमा

पुणे : कर्जफेडीची हमी मिळण्यासाठी आतापर्यंत केवळ कर्जावर घेण्यात आलेल्या पशुधनाचा विमा बँका काढत होत्या. तर काही पशुपालक जोखीम व्यवस्थापनासाठी विमा काढत होते. मात्र आता केंद्र शासनाच्या योजनेतून राज्यातील दुधाळ पशुधनाचा विमा काढण्यात येणार आहे.

यासाठी पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील २ लाख दुधाळ पशुधनाचा समावेश असणार आहे. तर पुढील टप्प्यात ५ लाख आणि नंतर टप्प्याटप्प्याने सर्व पशुधनाला विम्याचे संरक्षण मिळणार आहे. पशुपालक आणि पशुधनाला विम्याचे संरक्षण मिळावे, यासाठी केंद्र सरकारच्या वतीने पशुधनाचा विमा काढण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही योजना पशुधनाच्या दूध उत्पादन आणि वेतावर आधारित असणार आहे. यामधील विम्याचा ८० टक्के वाटा हा केंद्र शासनाचा आणि १५ टक्के राज्य सरकार आणि ५ टक्के ही रक्कम पशुपालकांची असणार आहे. यामध्ये विमा काढलेल्या प्रत्येक गाय, म्हशीला मायक्रो चिप लावण्यात येणार असून, त्यानुसार पशुधनाच्या आरोग्य आणि दूध उत्पादनावर संयनियंत्रण ठेवण्यात येणार आहे. तसेच ही योजना ऐच्छिक असणार आहे.

भरपाईचा भार होणार कमी : अतिवृष्टी, पूर, अपघात, साथरोगांमध्ये पशुधनाचा मृत्यू झाल्यावर त्यांच्या नुकसान भरपाईसाठी राज्य सरकारवर भार पडत आहे. या विमा योजनेतून आपत्तीकाळात पशुधन मृत झाल्यास विम्यामुळे भरपाई मिळणार आहे. यामुळे सरकारवरचा भार कमी होणार आहे.अतिवृष्टी, पूर, अपघात, साथरोगांमध्ये पशुधनाचा मृत्यू झाल्यावर त्यांच्या नुकसान भरपाईसाठी राज्य सरकारवर भार पडत आहे. या विमा योजनेतून आपत्तीकाळात पशुधन मृत झाल्यास विम्यामुळे भरपाई मिळणार आहे. यामुळे सरकारवरचा भार कमी होणार आहे.



## रब्बीत ग्लॅडिओलसच्या या टॉप ३ जातींची करा लागवड



खरीप पिकांची काढणीला सुरवात झाली आहे. दुसरीकडे रब्बी हंगामाची चाहूल लागली आहे. रब्बी हंगामात तुम्हाला जर फुल शेतीला प्राधान्य द्यायचे असेल तर ग्लॅडिओलस फुलांची शेती फायदेशीर ठरू शकते. ऑक्टोबर ते नोव्हेंबर हा हंगाम या फुलांच्या जातींसाठी आदर्श मानला जातो.

रब्बी हंगामात ग्लॅडिओलसची लागवड करून शेतकरी चांगला नफा कमवू शकतात. यामध्ये पुसा सिंदूरी, पुसा शांती आणि पुसा रजत या विविध जातींची लागवड केल्याने उत्पन्न लक्षणीयरीत्या वाढू शकते.

पुसा सिंदूरी : पुसा सिंदूरी ही ग्लॅडिओलस फुलांची एक सुधारित जात आहे. सुरुवातीच्या जातींना ६०-६५ दिवसांत फुले येण्यास सुरुवात होते, तर मध्यम आणि उशिरा जातींना ८० ते ११० दिवसांत पिकते. दिल्ली-एनसीआर आणि उत्तरेकडील मैदानी भागातील शेतकरी याची लागवड करू शकतात. प्रति रोप अंदाजे ३.३३ कॉर्म्स तयार होतात आणि प्रति माता कॉर्म अंदाजे ६७-७७ रोपे तयार होतात. प्रति एकर ४० हजार ते १ लाख २५ हजार स्पाइक्सचे उत्पादन शक्य आहे.

प्रमुख वैशिष्ट्ये - लांब अणकुचीदार टोक (९८.७७ सेमी), ज्यामध्ये मोठ्या प्रमाणात फुले असतात. कापलेली फुले पुष्पगुच्छ, फुलदाण्या आणि जपानी सजावट शैलींमध्ये वापरली जातात. या फुलांना मार्केटही चांगले आहे.

पूसा रजत : ग्लॅडिओलसची ही जात मोकळ्या शेतात, सौम्य हवामानात आणि चांगल्या सूर्यप्रकाशात, योग्य निचरा आणि चांगली पाणी धरून ठेवण्याची क्षमता असलेल्या वालुकामय जमिनीत लागवडीयोग्य आहे. तिच्या प्रत्येक काडीवर २० पेक्षा जास्त फुले, प्रत्येक रोपावर सरासरी ३.३३ रोपे आणि प्रत्येक रोपावर ६५-७० पेक्षा जास्त कोंब तयार करते. प्रमुख वैशिष्ट्ये - ०४ ते १०८ दिवसांत फुले येण्यास सुरुवात होते. फुले पांढरी असतात (एनएन १५५ बी). विविध प्रसंगी आणि सजावटीसाठी योग्य.

पुसा शांती : पुसा शांती ही जात विशेषतः दिल्ली-एनसीआर आणि उत्तरेकडील मैदानी भागांसाठी योग्य आहे. लागवडीसाठी सौम्य हवामान आणि चांगला निचरा होणारी जमीन आवश्यक आहे. प्रत्येक रोपावर अंदाजे ३.३३ कॉर्म आणि अंदाजे ६७.७७ कॉर्म तयार होतात. प्रमुख वैशिष्ट्ये - रोपाची उंची अंदाजे १४४.६६ सेमी आहे. काट्याची लांबी अंदाजे १२४.६६ सेमी आहे. ही मध्यम कालावधीची जात आहे, जी अंदाजे १०५ दिवसांत फुलण्यास सुरुवात करते. मजबूत रोपे आणि आकर्षक फुले बाजारात चांगली किंमत मिळवू शकतात.

## भोपळा वर्गीय भाज्यांवरील रोगांचे नियंत्रण

साधारण भाजीपाला म्हटले की, डोळ्यापुढे मोठा भाजीपाला येतो. भोपळा वर्गीय भाजीपाला विचारात घेतला की, समोर भोपळ्यासारख्या गोल भाज्या येतात. भोपळा वर्गीय भाजीपाला प्रामुख्याने भोपळा, तिखट, लौकी, काकडी, लुफा, पेठा, परवल आणि काकडी इत्यादी वर्गात पडतात. मुख्य भोपळे आणि भोपळा वर्गीय भाज्यांचे मुख्य रोग साधारण पुढीलप्रमाणे आहेत.

लाल भोपळा बीटल : भोपळा भाजीपाला किडी जो प्रामुख्याने भोपळा वर्गाच्या पिकावर हल्ला करतो तो लाल भोपळा बीटल आहे. या लाल रंगाच्या झाडाची पाने लवकर टप्प्यात खाल्ल्याने नष्ट होते, त्यामुळे पिकाची वाढ थांबते. जैविक नियंत्रण कारण्यासाठी अर्धा कप लाकूड राख आणि अर्धा कप मिसळा आणि निवडले की अर्धा कप लिटर पाण्यात काही तास सोडा. शेतात फवारणीपूर्वी काही संक्रमित पिकावर फवारणी करावी. दुसरा पर्याय म्हणून, ५% एनएस साबणाने मिसळला जाऊ शकतो आणि ७ दिवसांच्या अंतराने वापरला जाऊ शकतो.


फळांची माशी : फळांची माशी ही मादी कीटक फळांच्या आत अंडी घालते, नंतर अळ्या हळूहळू फळात बोगदा बनवितात आणि लगदा खाण्यास सुरवात करतात, ज्यामुळे फळ सडणे, विकृत होणे व चालू होते. यावर प्रतिबंध करताना शेतातील तण नष्ट करा.

मक्याची काढणी चारी बाजूंनी करावी कारण माशी उंच ठिकाणी बसायला आवडते. ज्यावर मालाथिऑन ईसी एमएल प्रमाणात अर्धा केजी चांगले आणि लिटर पाण्यात फवारणी केली जाते.

पांढरी माशी : हा किटक पांढरा पंख आणि पिवळ्या रंगाचा आहे, ही माशी एका मिली मीटरपेक्षा लहान आहे. ही माशी झाडाच्या पतीवर बसून रस शोषून घेते, लाळ तेथेच ठेवते, रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. यावर प्रतिबंध करताना कीटकांना आकर्षित करण्यासाठी पिवळ्या रंगाचे सापळे आणि चिकट टॅग वापरा शिकारी पक्ष्यांना आकर्षित करण्यासाठी टी आकाराच्या बांबूचे खांब प्रति एकर १ नग वापरा. प्रति किलो बियाणे इमिडाक्लोप्रिड ७० डब्ल्यूएस १० ग्रॅम वापरल्याने चांगला फायदा होईल.

माइट बारुथी : हा किडा उघड्या डोळ्यांनी पाहणे शक्य नाही, एका ठिकाणी तो कळपात मोठ्या संख्येने असतो आणि उन्हाळ्यात काकडीसारख्या पिकांमध्ये जास्त प्रादुर्भाव होतो, याचा प्रादुर्भाव झाल्यामुळे झाडे त्यांचे बनवण्यास असमर्थ आहेत. अन्न आणि बडवार थांबते.

यावर प्रतिबंध करण्यासाठी, पॉवर फवारणी यंत्राद्वारे पाण्याचे फवारणी केल्यास कोळी पिकापासून विभक्त होते, ज्यामुळे उद्रेक कमी होतो. स्पिरोमासिफेन ९ एससी ०.८ मिली प्रति लीटर किंवा डायकोफल १८.५ ई सी ५ मिली प्रति लिटर किंवा फेनप्रोथ्रीन ३० ईसी ०.७५ ग्रॅम प्रति लिटर १० ते १५ दिवसांच्या अंतराने शिंपडा जेणेकरून याचा प्रादुर्भाव कमी होऊ शकेल.



## उसावरील तपकीरी ठिपके व तांबेरा रोगांचे नियंत्रण



जुलै महिन्यापासून ते डिसेंबर दरम्यान असलेल्या आर्द्रतायुक्क्त, उष्ण व दमट हवामानामुळे पश्चिम महाराष्ट्रातील नदीलगत, जास्त पर्जन्यमान व हवेमध्ये ८०% पेक्षा जास्त आर्द्रता असलेल्या कोल्हापूर, रत्नागिरी, सांगली, पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यातील भागामध्ये ऊसाच्या पानावर विविध प्रकारच्या बुरशीजन्य रोगांचा प्रार्दुभाव जास्त प्रमाणात दिसून येत आहे. चालू वर्षी अहमदनगर जिल्ह्यात सातत्याने नेहमीपेक्षा जास्त पाऊस झाल्याने प्रामुख्याने तांबेरा आणि पानावरील तपकिरी ठिपके या रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. या पानावर आढळणाऱ्या बुरशीजन्य रोगांमुळे रोगाच्या तीव्रतेनुसार अंदाजे ५-४०% पर्यंत नुकसान होण्याची शक्यता असते.

तपकिरी ठिपके (ब्राऊन स्पॉट) : पश्चिम महाराष्ट्रामधील जास्त पावसाचे प्रमाण असलेल्या भागामध्ये सरकोस्पोरा लॉन्जिपस नावाच्या बुरशीमुळे मान्सून हंगामामध्ये हमखास आढळणारा हा बुरशीजन्य रोग आहे. रोगाच्या नावाप्रमाणे सुरूवातीला ऊसाच्या जुन्या पानांच्या दोन्ही बाजूवर अंडाकृती आकाराचे लालसर ते तपकिरी रंगाचे ठिपके आढळून येतात. अशा ठिपक्याभोवती पिवळ्या रंगाचे वलय दिसते. ठिपक्याच्या मध्यभाग वाळून, सुकून करड्या रंगाचा ठिपका, सभोवती लाल कडा त्याला लागूनच पिवळे वलय असे एकमेकांत मिसळलेले असंख्य ठिपके निदर्शनास येतात. बळी पडणाऱ्या जाती, अनुकूल वातावरण असल्यास रोगाची तीव्रता वाढून सर्व पानावर याचा प्रादुर्भाव दिसून येतो. पानांवरील ठिपक्यांची संख्या वाढून शेजारील ठिपके एकमेकात मिसळून मोठे ठिपके तयार होतात. अशा ठिपक्यांमधील पेशी मरतात आणि प्रकाश संश्लेषण होत नाही. त्यामुळे ऊसाच्या उत्पादनावर आणि साखर उताऱ्यावर अनिष्ट परिणाम होतो. रोगाची लागण मोठ्या प्रमाणावर झाल्यास ऊसाच्या कांड्याची लांबी व जाडी कमी होते.

तांबेरा : उसाच्या पानावरच दिसून येणारा हा बुरशीजन्य रोग आहे. सुरुवातीस बुरशीची लागण पानाच्या दोन्ही बाजूस होऊन पानावर लहान, लांबट आकाराचे पिवळे ठिपके दिसतात. कालांतराने ठिपक्याची लांबी वाढून त्यांचा रंग लालसर तपकिरी होतो. ठिपक्याच्या भोवती फिक्कट पिवळसर हिरवी कडा तयार होऊन, पानाच्या खालच्या बाजूस ठिपक्याच्या जाग्यावर उंचवटे तयार होतात. असे ठिपके फुटून नारंगी किंवा तांबूस तपकिरी रंगाचे बिजाणू बाहेर पडतात. तांबेराग्रस्त पाने हातावर चोळल्यास बिजाणूची पावडर पडते. हवेद्वारे या बिजाणूंचा प्रसार होऊन रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रसार होतो. पानांवरील ठिपक्यांची संख्या वाढून शेजारील ठिपके एकमेकांत मिसळून मोठे ठिपके तयार होतात. या रोगग्रस्त ठिपक्यातील पेशी मरून जाऊन पाने करपलेली दिसून येतात. प्रकाश संश्लेषण क्रियेत व्यत्यय आल्याने ऊसाचे उत्पादन घटते.

रोगाची कारणे : जुलै ते सप्टेंबरपर्यंत असणाऱ्या मान्सून पावसामुळे वाढणारी हवेतील सापेक्ष आर्द्रता साधारण ८०-९०%. ढगाळ उष्ण व दमट वातावरण, वाहणारे वारे आणि सकाळचे धुके व पडणारे दव. बळी पडणाऱ्या रुंद पानाच्या जातीची मोठ्या प्रमाणावर लागवड. नत्रयुक्त खतांचा प्रमाणापेक्षा जास्त वापर. ऊस पिकाच्या मुख्य वाढीचा काळ (३-७ महिन्याचा ऊस). उशीरा एप्रिल ते मे महिन्या व योग्य निचरा न होणाऱ्या जमिनीत झालेली ऊस लागवड. खोडवा पिकात रोगाची तीव्रता लागणीच्या पिकापेक्षा जास्त दिसून येते. सखल भागातील पाणी साचणे.

नियंत्रण कसे कराल : ऊस पिकाचे सर्वेक्षण करून, रोगांची लक्षणे, तीव्रता व पिकाची अवस्था पाहून खालीलप्रमाणे उपाययोजना करावी. मान्सून हंगामामध्ये रोगाच्या प्रादुर्भावाबाबत ऊस पिकाचे सर्वेक्षण अथवा पाहणी करून प्रतिबंधक शिफारशीत बुरशीनाशक फवारणी करावी. तुटून गेलेल्या जमिनीत पुनर्लागवड करावयाची असल्यास पूर्वी तुटून गेलेल्या ऊसाचे अवशेष गोळा करून त्यांचा नायनाट करावा. उसातील रोगग्रस्त पाने काढून नष्ट करावी. निरोगी बेणे मळ्यातील रोगमुक्त बेणे लागवडीसाठी वापरावे. रोगप्रतिकारक्षम जाती निवडून त्यांची लागवड करावी. (को ८६०३२) योग्य निचरा होणाऱ्या जमिनीत ऊस लागवड करावी. लागवडीसाठी रुंद सरी किंवा पट्टा पद्धतीचा अवलंब केल्यास ऊसामध्ये सुर्यप्रकाश व हवेचे प्रमाण वाढून रोगांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होते. नत्राची मात्रा शिफारशीनुसार द्यावी. जास्त वापर झाल्यास रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. पावसाळ्यात जास्त काळ पाणी साचलेल्या ऊस भागातील पाण्याचा निचरा करावा. पानांवरील तपकिरी ठिपके या बुरशीजन्य रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब अथवा कॉपर ऑक्सीक्लोराईड यापैकी एक बुरशीनाशक ०.३ टक्के (३ ग्रॅम प्रति लिटर पाणी) या प्रमाणात घेऊन १५ दिवसांच्या अंतराने स्टिकरचा वापर करून २-३ फवारण्या कराव्यात. रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यावर नियंत्रणासाठी ३ ग्रॅम / लि. पाणी मॅन्कोझेब किंवा टेबुकोन्याझोल १ मिली प्रति लिटर पाण्यामध्ये ऊसावर तांबेरा मिसळून १०-१५ दिवसांच्या अंतराने स्टिकरचा वापर करून २-३ फवारण्या कराव्यात. सामुहिक पद्धतीने रोगाच्या नियंत्रणासाठी उपाययोजनाचा अवलंबन करावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

४००४ ई. पू. : उस्शेर कालक्रमानुसार सुमारे संध्याकाळी सहा वाजता जग तयार केले गेले.
१६३३ : लियाओउलू उपसागाराची लढाई: मिंग राजघराण्याने डच ईस्ट इंडिया कंपनीला पराभूत केले.
१७९७ : बलूनमधून १००० मीटर उंच जाऊन पॅराशूटच्या साहाय्याने आंद्रे जॅक्स गार्नेरिन जमिनीवर उतरणारा पहिला मानव बनला.
१९२७ : निकोला टेस्ला यांनी सिंगल-फेज इलेक्ट्रिकसह सहा नवीन शोध लावले.
१९३८ : चेस्टर कार्लसनने जगातील पहिले झेरॉक्स मशिन तयार केले.
१९६३ : पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते भाक्रा धरण राष्ट्राला अर्पण करण्यात आले.
१९६४ : फ्रेन्च लेखक, कवी आणि तत्त्वज्ञ जेआँ-पॉल सार्त्र यांना नोबेल पुरस्कार मिळाला पण त्यांनी तो नाकारला.
१९९४ : भारतीय उद्योगपती नवीनभाई सी. दवे यांना ब्रिटनच्या महाराणी एलिझाबेथ यांचा उद्योग व शिक्षण क्षेत्रातील कार्याबद्दल कोट ऑफ आर्म्स पुरस्कार जाहीर.
२००१ : ग्रँड थेफ्ट ऑटो ३ हा वीडीओ गेम प्रकाशित झाला.
२००८ : भारताने पहिल्या मानवविरहित चांद्रयान-१ चे प्रक्षेपण केले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६८९ : पोर्तुगालचा राजा जॉन (पाचवा) यांचा जन्म. (मृत्यू: ३१ जुलै १७५०)
१८७३ : अमृतानुभवी संत तीर्थराम हिरानंद गोसावी ऊर्फ स्वामी रामतीर्थ यांचा जन्म. (मृत्यू: १७ ऑक्टोबर १९०६)
१९०० : भारतीय स्वातंत्र्यसैनिक अश्फाकुला खान यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर १९२७)
१९४२ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे छायाचित्रकार रघूवीर सिंह यांचा जन्म. (मृत्यू: १८ एप्रिल १९९९ न्यूयॉर्क)
१९४७ : भारतीय वंशाचे अमेरिकन डॉक्टर व लेखक दीपक चोप्रा यांचा जन्म.
१९४८ : इंग्लंडचा गोलंदाज माईक हेंड्रिक यांचा जन्म.
१९८८ : भारतीय अभिनेत्री परिणीती चोप्रा यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९१७ : इंडियन जर्नल ऑफ मेडिकल रिसर्चचे संस्थापक चार्ल्स पार्डे ल्यूकिस यांचे निधन.
१९३३ : थोर देशभक्त बॅ. विठ्ठलभाई पटेल यांचे निधन. (जन्म: १८ फेब्रुवारी १८७१)
१९७८ : साहित्यिक व वक्ते नारायण सीताराम तथा ना. सी. फडके यांचे निधन. (जन्म: ४ ऑगस्ट १८९४)
१९९१ : देहदान चळवळीचे पुरस्कर्ते व देहदान सहाय्यक मंडळाचे संस्थापक ग. म. सोहोनी यांचे निधन.
१९९८ : हिंदी चित्रपटांतील खलनायक अजित खान ऊर्फ अजित यांचे निधन. (जन्म: २७ जानेवारी १९२२)
२००० : अहमदनगर एज्युकेशन सोसायटीचे प्रमुख कार्यवाह, सामाजिक कार्यकर्ते व उद्योगपती अशोक मोतीलाल फिरोदिया यांचे निधन.
२०१४ : भारतीय दिग्दर्शक आणि सिनेमॅटोग्राफर अशोक कुमार यांचे निधन.

## पालकाच्या योग्य जाती पिकवल्यास मिळेल भरघोस नफा



शेतकरी चांगला नफा मिळविण्यासाठी पालकाची लागवड करू शकतात. पालकाचे बरेच प्रकार आहेत. भारतात पालकाची लागवड रब्बी, खरीप आणि उन्हाळी या तीनही पीक हंगामामध्ये केली जाते. यासाठी शेतात पाण्याचा निचरा करण्याची चांगली व्यवस्था असावी. तसेच हलक्या चिकणमाती जमिनीत पालकाच्या पानांचे चांगले उत्पादन मिळते.

या गोष्टींकडे विशेष लक्ष द्या : पेरणीपूर्वी बियाण्यास २ ग्रॅम कॅप्टन प्रति किलोग्रॅमची प्रक्रिया करावी, जेणेकरून उत्पादन चांगले मिळेल. पेरणीसाठी ओळीपासून ओळीपर्यंत २५-३० सेंमी आणि रोपापासून रोपापर्यंत ७-१० सेमी अंतर ठेवावे. पालक लागवडीसाठी, हवामान आणि मातीनुसार जास्त उत्पादन देणारे सुधारित वाण निवडू शकतात.

देशी पालक : देशी पालक बाजारात चांगल्या दराने विकला जातो. देशी पालकाची पाने लहान, गुळगुळीत आणि अंडाकृती असतात. ते खूप लवकर तयार होते, म्हणून बहुतांश शेतकरी त्याची लागवड करतात.

विलायती पालक : परदेशी पालकाच्या बिया गोल आणि काटेरी असतात. डोंगराळ आणि थंड ठिकाणी काटेरी बियाणे वाढवणे अधिक फायदेशीर आहे. मैदानी भागातही गोल जातींची लागवड केली जाते.

ऑल ग्रीन : हिरव्या पालेभाज्या पालकाची जात १५ ते २० दिवसांत तयार होते. एकदा पेरणी केल्यानंतर ते सहा ते सात वेळा पाने कापू शकते. ही वाण निःसंशयपणे जास्त उत्पादन देते, परंतु हिवाळ्यात लागवड केल्यास ७० दिवसांत बियाणे आणि पाने तयार होतात.पुसा हरित : वर्षभराचा खप भागवण्यासाठी अनेक शेतकरी पुसा हरितची लागवड करतात. त्याची वाढ सरळ वरच्या बाजूस असते आणि त्याची पाने गडद हिरवी आणि आकाराने मोठी असतात. क्षारयुक्त जमिनीवर त्याची लागवड करण्याचे अनेक फायदे आहेत.



बुधवार दि.२२ ऑक्टोबर २०२५ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत




# वाद्यरंग महोत्सवात अहिल्यानगर जिल्ह्यातील दुर्मिळ पारंपारिक लोककलांचे दर्शन

अहिल्यानगर

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने प्रभादेवी मुंबई येथील कलांगणच्या व्यासपीठावर अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव, श्रीगोंदा, राहुरी, नेवासा तालुक्यातील दुर्मिळ व पारंपारिक लोककलावंतांनी आपली विविध रंगी कला सादर करून सप्तरंगाची उधळण केली. महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ना. ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या कार्यक्रमास वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, सांस्कृतिक खात्याचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, सहसंचालक श्रीराम पांडे आदी मान्यवर उपस्थित होते. अहिल्यानगर जिल्ह्यातील लोककला अभ्यासक व मुक्त पत्रकार भगवान राऊत यांच्या पुढाकारातून रामनगर शेवगाव येथील स्मशान जोगी लक्ष्मण शेंडरे, हनुमंता कडमींचे, डक्कलवार धर्मा कांबळे, रामा यशवंत वीर, नेवासा तालुक्यातील नजीक चिंचोली येथील गोंधळी दिगंबर गोंधळी, राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील पिंगळा जोशी दिलीप वायफळकर, बालाजी वायफळकर,



श्रीगोंदा तालुक्यातील ढोकराई येथील शामराव शिंदे, मारुती शिंदे, राजू शिंदे व शिवाजी थिटे आदी कलावंत घाटोळे, शंख, किंगरी, संबळ, दिमडी, गुडगुडी, सारंगी आदी दुर्मिळ व पारंपारिक वाद्य घेऊन सहभागी झाले होते.

प्रभादेवी येथील रवींद्र नाट्य मंदिरा शेजारी कलांगण परिसरात विविध दुर्मिळ व पारंपारिक वाद्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ना. ॲड. आशिष शेलार यांच्या शुभहस्ते फीत कापून या प्रदर्शन व वाद्यरंग महोत्सवाचे शानदार उद्घाटन झाले. यावेळी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी सांस्कृतिक मंत्री ॲड. आशिष शेलार यांना विविध दुर्मिळ व पारंपारिक वाद्य तसेच महाराष्ट्रातील विविध पारंपारिक लोककलांबद्दल माहिती दिली. मान्यवरांच्या हस्ते विधिनाट्य व इतर पुस्तकाचे प्रकाशन तसेच टपाल तिकिटाचे अनावरण करण्यात आले. वाद्यरंग हा अतिशय उत्तम कार्यक्रम असून महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीमध्ये विविध पारंपारिक लोककला व लोकवाद्यांचे उच्च स्थान आहे. वाद्यरंग महोत्सवात सहभागी झालेल्या सर्व लोक कलावंतांचे त्यांनी कौतुक केले. या कार्यक्रमास अहिल्यानगर आकाशवाणी केंद्राचे माजी कार्यक्रमाधिकारी बाबासाहेब खराडे, भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे राज्यसचिव ॲड. कॉम्रेड सुभाष लांडे पाटील, सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक तथा कवयित्री रीता जाधव यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील कलावंतांच्या प्रत्यक्ष भेटी घेऊन त्यांच्या कलेचे कौतुक केले. या कार्यक्रमात पालघर व ठाणे जिल्ह्यातील विविध आदिवासी पाड्याहून तारपा, तुर, गांगळी, डाक, सुरथाळ, सनई, संबळ अशी वाद्य घेऊन विवाह सुनाड, अर्जुन नडगे, जाना देऊ, वाजे लक्ष्मण, गोविंद गंगा, गोविंद सिताराम, बर्फ तुकाराम खरपडे, राजन वैद्य असे कलावंत सहभागी झाले होते. त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील अनेक आदिवासी बंधू भगिनी डेरा, मादळ, नगरा सारखी वाद्य घेऊन सहभागी झाले होते.

# राष्ट्रवादी काँग्रेसकडून काळी दिवाळी साजरी



परभणी। प्रतिनिधी

राज्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असताना, महायुती सरकारने जाहीर केलेले ३६,५०० कोटींचे मदत पॅकेज फसवे व अपुरे असून, बळीराजाच्या जखमेवर मीठ चोळणारे आहे, असा घणाघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) ने केला. या निषेधार्थ परभणीत सोमवारी (दि.२०) काळी दिवाळी साजरी करत मौन आंदोलनातून सरकारचा निषेध नोंदवला.

जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली अंदाजे १०० पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काळे कपडे परिधान करून शांततेत मौन आंदोलन केले. यावेळी सरकार शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळतेय, ५० हजार हेक्टरी मदत द्या, सरसकट कर्जमाफी लागू करा अशा घोषणा फलकांवर झळकत होत्या. राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन राज्यातील खरीप हंगामातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानाचा योग्य पंचनामा करून, पंजाबप्रमाणे तत्काळ हेक्टरी ५० हजारांची मदत द्यावी, अशी मागणी केली. सरकार ३६,५०० कोटींचे पॅकेज सांगत असली तरी, प्रत्यक्षात उपलब्ध आकडेवारीनुसार ही मदत १६ ते १७हजार कोटी रुपयांच्या पुढे जात नाही, असा आरोपही या निवेदनात करण्यात आला आहे. आंदोलनात जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे, जिंतूर तालुकाध्यक्ष मनोज थिटे, इंजि. रामदास आढे, अशोक चांदवडे, सय्यद नवाब, गजानन लव्हाळे, उपाध्यक्ष ॲड. अंकुश कच्छवे, कार्याध्यक्ष संतोष बोबडे, गंगाधर जवंजाळ, लखन चव्हाण, गंगाप्रसाद यादव आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# महावितरण विरोधात शेतकऱ्यांचा रास्ता रोको

जालना। प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील वीज वितरण कंपनीचा गलथान कारभार उघड झाला आहे. निमखेडा येथील शेतातून गेलेल्या विद्युत तारांत शॉर्टसर्किट झाल्या मुळे सुमारे ६० एकरवरील उसाला आग लागली. सुमारे ३ हजार ५०० टन उसाचे क्षेत्र जळून भस्मसात झाले. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी जाफराबाद शहरात रास्ता रोको आंदोलन केले.

निमखेडा गावात ऊसउत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाले असताना वीज वितरण कंपनीचे अधिकारी, महसूलचे अधिकारी स्थळ पाहणीसाठी न आल्यामुळे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी निमखेडा बु. येथील शेतकऱ्यांनी जाफराबाद शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात रास्ता रोको आंदोलन सुरू केले. त्यामुळे जाफराबाद येथून विदर्भ, खानदेश आणि छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी वाहतूक विस्कळीत झाली होती. जाफराबाद तालुक्यातील उसाचे क्षेत्र असलेल्या निमखेडा बु., देऊळझरी,



हनुमंतखेडा, ब्रह्मपुरी, कुंभारझरी, आळंद, हिवराकाबली, नळविहिरा यांसारख्या उसाचे क्षेत्र असलेल्या गावातून वीज वितरण कंपनीचे उपविभागीय अभियंता चेतन मोहेकर यांना शेतामध्ये लोंबकळलेल्या विजेच्या तारा, आणि वाकलेले विजेचे खांब, याविषयी शेतकऱ्यांनी अर्ज देऊन दुरुस्तीची मागणी केली होती. परंतु याकडे दुर्लक्ष केल्यामुळे निमखेडा शिव- ारात उसाच्या शेतात शार्टसर्किट झाले. जिजाबाई हिवाळे, बाबुराव चव्हाण, शेनफड चव्हाण, उत्तम चव्हाण, गंजीधर चव्हाण, प्रभाकर चव्हाण, विठ्ठल चव्हाण, वाल्मिक हिवाळे, प्रल्हाद हिवाळे, सुभाष चव्हाण, याचे ऊस तर हरिदास वाघमारे यांची कपाशी, तूर जळून भस्मसात झाली. ऐन दिवाळी सणासुदीच्या काळात या शेतकऱ्यांच्या घरी काळा कुट्ट अंधार झाला आहे. आंदोलकांची पोलिस निरीक्षक सतीश जाधव, अभियंता भुसारी, मंडळ अधिकारी काळे यांनी भेट घेतली.

# मनपा कामगारांच्या पगारात दहा हजारांची वाढ

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

महापालिकेने कंत्राटदार एजन्सी बदलताच कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या पगारात यंदा दिवाळीपूर्वीच भरघोस वाढ करण्यात आली आहे. मनपा आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांनी कंत्राटी कर्मचाऱ्यांना एजन्सीकडून किमान वेतन देण्याचे आदेश दिल्यानंतर ही वाढ लागू झाली, त्यामुळे वाहनचालक व मजुरांच्या पगारात सुमारे दहा हजार रुपयांनी वाढ झाली असल्याने कंत्राटी कर्मचाऱ्यांची यंदाची दिवाळी अधिक गोड झाली आहे. या पार्श्वभूमीवर यांत्रिकी विभागाच्या वतीने शनिवारी जकात नाका येथील वर्कशॉपमध्ये आयुक्त जी. श्रीकांत यांचा सत्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

महापालिकेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना गेल्या काही महिन्यांपासून वाढीव वेतनाची अपेक्षा होती. आयुक्तांनी दिलेल्या आदेशानुसार आता एजन्सींना कर्मचाऱ्यांना शासनाने निश्चित केलेले किमान वेतन देणे




बंधनकारक ठरले आहे. त्यामुळे कंत्राटी वाहनचालकांचा पगार १५ हजारांवरून २१,२०० रुपये, तर मजुरांचा पगार १३ हजारांवरून १९,६०० रुपये इतका वाढला आहे.

एवढेच नव्हे तर मागील दोन महिन्यांचा पगारही एकत्र देण्यात आल्याने कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलले आहे. आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयामुळे पगारात भरघोस वाढ झाल्याने कर्मचार्यांच्यावतीने त्यांच्या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी फुलांची उधळण व टाळ्यांच्या गजरात आयुक्तांचे स्वागत करून मोठ्या उत्साहात सत्कार सो-हळा पार पडला. या कार्यक्रमाला यांत्रिकी विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी, उपअभियंता सचिन वाईकर, कनिष्ठ अभियंते वैभव बोरकर, प्रेषित वाघमारे, राधिका चव्हाण, प्रफुल्ल राठोड, शुभम भुमरे, तसेच कंत्राटी कर्मचारी सुभाष काने, जयेश नरवडे, नरेश इंगळे यांच्यासह मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते. कर्मचाऱ्यांनी आयुक्तांचे मनःपूर्वक आभार मानत, यंदा खरी दिवाळी झाली, अशी भावना व्यक्त केली.

# वंचित बहुजन आघाडीची पाटोद्यात रणनिती बैठक

पाटोदा। प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने पाटोदा येथे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण नियोजन बैठक पार पडली. या बैठकीत स्वबळावर निवडणूक लढविण्याचा निर्धार, बूथस्तरावर संघटन बळकट करणे, आणि सामाजिक व विकासात्मक मुद्द्यांवर ठाम भूमिका घेण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीचे अध्यक्ष जिल्हाध्यक्ष अजय सरवदे होते. त्यांनी ही लढाई जनतेसाठी असल्याचे सांगितले. यावेळी खंडू नाना जाधव, सचिन मेघडंबर, बाळासाहेब गायकवाड

आदी पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सरवदे यांनी ''हुकूमशाहीला पूर्णविराम, आता



वंचितलाच संधी!'' या घोषणेने कार्यकर्त्यांनी एकजूट दाखवली. बैठकीत आगामी कार्यक्रमांचे नियोजन, जबाबदाऱ्या वाटप व पक्षविस्तारावर चर्चा झाली. या बैठकीला मिलिंद सरपते,दीपक थोरात, गोविंद यादव, मधुकर पायाळ,गणेश पवळ, अनिकेत जावळे, सिद्धार्थ आगे, ईश्वर चौरे, राहुल शिरोळे, गणेश सोनवणे सह तालुक्यातील अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्नेहसावली परिवारास दिवाळीची उबदार भेट

## दिवाळीचा किराणा देऊन केली दिवाळी गोड

बीड। प्रतिनिधी

बीड जवळील रामनगर येथे कार्यरत असलेल्या स्नेहसावली परिवारात वंचित मुले, मुली आणि वृद्धांची निःस्वार्थ सेवा निलेश व वैष्णवी मोहिते हे दाम्पत्य गेल्या काही वर्षांपासून करीत आहेत. सध्या या ठिकाणी सुमारे ३० लहान मुले-मुली आणि १२ वृद्ध राहतात. या सर्वांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद खुलवण्यासाठी माणुसकी टीम बीड ने एक हृदयस्पर्शी उपक्रम राबवला.

दिवाळी फराळासाठी लागणारे सुमारे ₹४१०० मूल्याचे किराणा साहित्य माणुसकी टीमकडून स्नेहसावली परिवारास भेट म्हणून देण्यात आले. या उपक्रमामुळे या वंचित मुला-मुलींना आणि वृद्धांना दिवाळीचा आनंद लाभला.



माणुसकी टीम गेल्या दहा वर्षांपासून समाजातील वंचित घटकांसाठी निःस्वार्थपणे कार्य करत आहे. या संस्थेचे नेतृत्व कीर्तनकार श्रीकृष्ण महाराज उबाळे करत असून त्यांच्या पुढाकाराने दरवर्षी दिवाळीच्या निमित्ताने मदत केली जाते. या कार्यात त्यांना मित्रपरिवाराने आर्थिक मदत केली. या भेटीच्या वेळी जालिंदर नाईकवाडे, सुधाकर राठोड, अमोल तुपे आणि संतोष डोंगरे हे माणुसकी टीमचे कार्यकर्ते उपस्थित होते. माणुसकी टीमचा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरला आहे. दिवाळीच्या सणाच्या निमित्ताने वंचितांपर्यंत आनंद पोहोचवणं, हीच खरी माणुसकी आणि खरी दिवाळीची ओवाळणी आहे, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. या संस्थेबरोबर पूरग्रस्त तसेच आदिवासी बांधवांनाही दिवाळी भेट दिली जाणार आहे.

# चाकूचा धाक दाखवून कामगारास लुटणारे दोन भामटे गजाआड

संभाजीनगर। प्रतिनिधी

चाकूचा धाक दाखवून एका कामगाराच्या फोनपेवरून ८ हजार ५० रुपये ट्रान्जेक्शन करून त्यास लुटणाऱ्या दोघा सराईत चोरट्यांना एमआयडीसी वाळूज पोलिसांनी अटक केली. कृष्णा भास्कर चक्रे (३०) व गजानन फकिरा जाधव (३२, दोघे रा. ओमसाईनगर, कमळापूर रांजणगाव) असे अटक केलेल्या या चोरट्यांची नावे आहेत. पोलिसांनी त्यांच्याजवळून एक दुचाकी, धारदार चाकू, मोबाईल तसेच रोख ४ हजार असा ४९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या विषयी पोलिसांनी सांगितले की, रमेश शिवलाल राठोड (३२, रा. जो गेशवाडी, जामखेड ह.मु. बजाजनगर) हा वाळूज औद्योगिक क्षेत्रात काम करतो. रविवारी सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास तो कोलगेट चौकातून घराकडे जात होता. यावेळी एका दुचाकीवरून आलेल्या दोन भामट्यांनी चाकूचा धाक दाखवून रमेशचा मोबाईल बळजबरीने हिसकावून घेतला. तसेच त्याच्या फोन पेचा पासवर्ड विचारून त्याच्या खात्यावरील ८ हजार ५० रुपये त्यांच्या फोनपेवर वळती करून घेतले व त्यास जिवे मारण्याची धमकी देऊन दोघे तेथून पसार झाले होते. या गुन्ह्याचा तपास सुरू असताना पोलिस निरीक्षक रामेश्वर गाडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाचे प्रमुख पोलिस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर व त्यांच्या पथकातील अमलदारांनी गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीवरून कृष्णा चक्रे व गजानन जाधव या दोघांना बिकेटी कंपनीजवळ ताब्यात घेतले. यावेळी पोलिसांनी त्यांच्याजवळून (एमएच १९, एयू-२१६५) या क्रमांकाची चोरीची दुचाकी, एक धारदार चाकू, मोबाईल व रोख ४ हजार रुपये असा जवळपास ४९ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

# आंनदग्रामच्या लेकरांची दिवाळी केल्याचा आनंदच वेगळा असतो -जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे दरवर्षी आंनदग्राम येथील लेकरांची दिवाळी केल्याशिवाय स्वतः दिवाळी साजरी करत नाहीत. गेल्या १९ वर्षांपासून त्यांचा हा संकल्प आजही सुरू आहे. आण्णा आले की लेकरांच्या चेहऱ्यावर दिसणारा आंनद काही वेगळाच अनुभवता येतो. आमच्या अनाथांचा नाथ आमच्यात येऊन दरवर्षी आमच्या चिल्यापिल्याना काहींना काही घेऊनच येतो, त्या लेकरांनी आजही आंनद लुटला, त्यातच बीडच्या संगीत क्षेत्रात नावलौकिक असणारे कलाकार देखील आपली संगीत सेवा सादर करतात, आंनद ग्रामचा दिवाळी सणाचा हा आनंद असाच कायम राहो अशी सदिच्छा माजी मंत्री क्षीरसागर यांनी व्यक्त केली.

दरवर्षीप्रमाणे गेल्या १९ वर्षापासून माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे इन्फंट इंडिया या आनंदग्रामच्या संस्थेत जाऊन दिवाळी साजरी




करत असतात. आजही लक्ष्मीपूजनाच्या पूर्वसंध्येला माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे चिमुकल्यांसाठी झोपण्याकरता पलंग आणि दिवाळी साहित्य घेऊन आनंदग्राम वर पोहोचले. गाड्यांचा ताफा पोहोचल्यानंतर तेथील लहानग्यांनी अण्णा आले- अण्णा आले असे म्हणत अक्षरशः त्यांना बिलगून जात आपला पालक आपल्यासाठी आपल्या आनंदासाठी आजही आपल्याकडे आला आहे हे चेहऱ्यावरचे हावभाव त्यांचा आनंद सांगून जात होता. आनंदग्राम मधील साजरी झालेली ही दिवाळी आगळीवेगळीच होती. यावेळी जगदीश काळे, विलास बडगे, दिनकर कदम, अरुण डाके, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज मंझरीकर, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, तानाजी कदम, सुग्रीव रसाळ, चंद्रकांत पेंढारे, अरुण बोंगाणे, मनोज पाठक, जगन्नाथ मोरे, राजाभाऊ शेळके, दशरथ राऊत, दिलीप शेळके, अंबादास गुजर, दूध संघाचे कार्यकारी संचालक संतोष श्रीखंडे यांच्यासह बीड येथील नामांकित कलाकार भरत लोळगे, वेद मुळे, देव मुळे, महेश वाघमारे, तबला वादक नरहरी दळे, के.सी. चव्हाण यांचीही उपस्थिती होती. प्रारंभी माजी मंत्री क्षीरसागर यांनी शेकडो मुलांसाठी दिलेल्या पलंगाचा वाटप कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर दीप प्रज्वलन करून संगीत रजनीला सुरुवात झाली. यावेळी येथील चिमुकल्यांनी माजी मंत्री क्षीरसागर यांचे स्वागत केले. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, दरवर्षी आनंदग्रामचा हा आनंदी क्षण आपण अनुभवत असतो, चिमुकल्या लेकरांची दिवाळी झाल्याशिवाय आपली दिवाळी साजरी झाल्याचे समाधानच होत नाही. बारगजे कुटुंबीय सगळेच या प्रकल्पासाठी मनोभावे सेवा करतात. रात्र-दिवस झटतात,त्यांना मदत व्हावी लेकरांची अडचण सुटावी यासाठी खारीचा वाटा आपण उचलत असतो. हे आपले भाग्य आहे हे पुंण्याचे काम आहे अशी माणसे शोधूनही सापडत नाहीत. मुलांची मानसिक अवहेलना, कुचंबांना होऊ नये याची काळजी या ठिकाणी घेतली जाते. येथील लहानग्यांनी दिवाळीसाठी लागणाऱ्या विविध वस्तू तयार करून ५३ हजार रुपये वस्तूंची विक्री केली हे कौतुकास्पद आहे. ज्यांना कोणी स्वीकारत नाही अशांचा स्वीकार करून बारगजे कुटुंबीय लाख मोलाचे काम करत आहे. हा सेवाभाव माणसाच्या मनात असणे खूप महत्त्वाचे आहे मुलांना झोपण्यासाठी पलंगाची गरज होती ती आज पूर्ण झाली आहे. इथे सर्व जाती धर्मातील मुले असतात जातीचे राजकारण करणाऱ्यांनी थोडेसे इकडे जर पाहिले तर आपण कोणत्या विश्वात आहोत याची जाणीव होईल. लहानग्यांच्या वेदना जाणून घेत त्यांच्या आनंदात आपण सहभागी व्हावे. मनाला एक वेगळाच आंनद मिळेल,समाजातून बाहेर टाकलेल्या चिमुकल्या साठी जे-जे करता येईल ते आपण करणार आहोत असे सांगून माजी मंत्री क्षीरसागर यांनी संगीत गायनाचे श्रवण केले. यावेळी संचालक दत्ता बारगजे यांनीही अण्णांनी केलेल्या आजपर्यंतच्या सहकार्याची आठवण करून दिली. येथील अनाथ मुलांना अण्णांचं नाथ झाले म्हणून आज आम्ही येथे सुरक्षित असल्याचे ते म्हणाले. यावेळी परिसरातील गावातून अनेक प्रमुख मान्यवर उपस्थित होते.

# ग्रामीण भागामध्ये अनेकांची दिवाळी अंधारात

## शेतकऱ्यांचे अनुदान वेळेत न पडल्याने पदरी निराशाच

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील शहरांमध्ये नोकरदार वर्ग, व्यापारी वर्ग आणि श्रीमंतांची दिवाळी हर्षोल्हासात झाली असली तरी ग्रामीण भागात मात्र अनेकांच्या घरी दिवाळी अंधारात झाली.शेतकऱ्यांचे अनुदान वेळेत मिळाले नसल्याने शेतकऱ्यांच्या पदरी निराशाच आली. ग्रामीण भागातील आर्थिक उलाढाल केवळ नुकसान भरपाईवर अवलंबून असल्याने ग्रामीण भागाची दिवाळी यावर्षी अंधारात झाली. शेतकऱ्यांकडे पैसा आला तर तो झटपट बाजारात येतो आणि सर्वच ठिकाणी बाजारात तेजी येते. ग्रामीण भागातील गोरगरिबांची दिवाळीही यावरच अवलंबून असते. बाजारामध्ये हाच पैसा झटपट येतो. मात्र यावर्षी सरकारने शेतकऱ्यांची दिवाळी गोड करू असे म्हणून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणी पुसली. दिवाळीच्या दिवशी उशिरापर्यंत अनेकांच्या खात्यावर पैसे झाले नाहीत. त्यामुळे खरेदी करण्याचा प्रश्नच नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी दिवाळी साजरी केली नाही. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था ही शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर अवलंबून असते. मात्र यावर्षी उत्पन्नाचा सुपडा साफ झाल्याने शेतकरी अडचणीतच आहे. त्याबरोबर शेतकऱ्यावर अवलंबून असलेले अनेक ग्रामीण भागातील शेतमजूर यांचीही यामुळे अडचण झाली. शेतकऱ्यांना अडचण आहे म्हणजे विहिरीतच नाही तर पोहऱ्यात कुठून येणार अशा स्थितीत इतरांची दिवाळी ही अंधारातच साजरी झाली. आज ग्रामीण भागात निराशेचे वातावरण आहे. प्रशासन प्रयत्नांची पराकाष्टा करत असल्याचे दाखवत असले तरी प्रत्यक्षात मात्र त्याचा रिझल्ट दिसत नाही. अनेक शेतकऱ्यांना फार्मर आयडी असला तरी केवायसी करा म्हणून निरोप येतो. जर फार्मर आयडी असतांनाही केवायसी करावी लागणार असेल तर मग फार्मर आयडीचा काय उपयोग? अनेक ठिकाणी फार्मर आयडी असुनही शेतकऱ्यांना पैसे मिळाले नाहीत. जी मदत मिळाली तिही तुटपूंजी. कुठल्या बेसवर ही मदत दिली गेली हे शेतकऱ्यांना कळायला तयार नाही. मंगळवारी रात्री उशिरा काही शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे आले. मात्र तीही रक्कम शासनाने दिलेल्या शब्दांनुसार मिळाली नाही. त्यामुळे अनेकांची निराशा झाली. एक तर पैसे वेळेवर मिळाले नाहीत आणि जे मिळाले तेही तुटपुंजे मिळाल्याने सरकारच्या विरोधात शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. सरकार बोलतेय एक आणि करते एक अशी भावना शेतकऱ्यांची आहे. शेतकऱ्यांना जर वेळेत मदत करता येत नसेल तर मग मोठमोठी बॅनरबाजी करून आणि मोठमोठ्या जाहिराती करून सरकार नेमके काय मिळवते आहे ?असाही सवाल संतप्त शेतकरी करीत आहेत. सरकारमधील नेत्यांनी जेवढे देणे शक्य आहे तेवढेच बोलावे अशी अपेक्षा शेतकऱ्याकडून व्यक्त होत आहे.

### जगाचा पोशिंदाच उपाशी

देशामध्ये सर्वत्र उत्साहात दिवाळी साजरी होत असली तरी शेतकरी मात्र आज अडचणीत आहे. अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रामध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. यामध्ये होत्याचे नव्हते झाले .शेतकऱ्याकडे कवडी शिल्लक राहिली नाही. ज्या उत्पन्नाच्या आशेवर बी बियाणे आणि खतांसाठी खर्च केला. त्या उत्पन्नाचा सुपडा साफ झाला. शेतकऱ्यांनी काय करायचे असा प्रसन्न निर्माण झाला. सरकारी दरबारी आश्वासने दिली. पंचनामे झाले मात्र प्रत्यक्षात काय हाती आले? असा मोठा प्रश्न आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वेळेत न मिळाल्यामुळे आज शेतकरी हिंदू संस्कृतीच्या सर्वात मोठ्या सणांमध्ये ही उपाशीच राहिला आहे.



आष्टी शहरातील मुख्य बाजारपेठेमध्ये शनी चौकात काल सोमवारी दिवाळीच्या आदल्या दिवशी कपड्याच्या दुकानात किराणा दुकानात व स्टेशनरी दुकानांमध्ये दीपावलीची खरेदी करण्यासाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली यामध्ये रस्ते मोठे असताना देखील वाहतुकी बोजवारा उडाला कपड्याच्या दुकानासमोर मोठ्या प्रमाणावर दुचाकी लागल्याने चार चाकी स्वरांना रस्त्यावर रहदारी करण्यास मोठा अडथळा निर्माण झाला. शरद रेडेकर आष्टी

## स.निबंधक सुरज जगदाळेसह शेरखाने यांचे निलंबन करुन त्यांच्यावर गुन्हे दाखल करा -भाई नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी

सहाय्यक निबंधक सहकारी संस्था ही सहकारी संस्थेच्या कार्यभारावर नियंत्रण ठेवणारी संस्था असून माजलगाव तालुक्यातील मराठवाडा अर्बन को आप क्रेडिट सोसायटीत गैरव्यवहार झाल्याबाबत संचालका सह कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल झाले असून या संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्यात आले असून ठेवीदारांच्या ठेवी वसुलीतुन परत मिळविण्याच्या आशा पल्लवित झाल्याने अनेक ठेवीदार हे प्रशासक सतिश शेरखाने यांचे सह सहायक निबंधक यांच्या कार्यालयाचे दरवाजे झिजवुन कंटाळले तर काही गरीब ठेवीदारांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली,खरात आडगाव येथील गरीब अल्पभुधारक शेतकरी तुकाराम कुलकर्णी यांनी त्यांच्या आजारपणात उपचारासाठी ठेवीची रक्कम मिळावी म्हणून शेकडो चकरा मारल्या परंतु त्यांच्या आजपणाकडे प्रशासकाने गांभीर्याने पाहिले नाही या उलट त्यांच्याशी उद्धटपणा करून पैसे मिळणार नसल्याचे सांगितले या उलट अनेक ठेवीदारांच्या ठेवी परत देण्यासाठी २०% रकमेची मागणी करुन ठेविदाराची लुट करूनच ठेवी देण्यात आली व अनाधिकृत २०%रक्कम न दिल्याने अनेकांच्या ठेवी नाकारण्यात आल्या, तुकाराम कुलकर्णी यांना सदर गोष्टीचा मानसिक त्रास झाल्याने त्यांना हृदयविकाराचा झटका आला व उपचारासाठी पैसे न मिळाल्याने त्यात त्यांचे निधन झाले त्यानंतर देखिल त्यांच्या कुटुंबियांनी शेकडो चकरा मारुन खाजगी सावकाराकडून घेतलेल्या पैशासाठी ठेवीची मागणी केली परंतु निगरगट्ट प्रशासक सहकार्य करायला तयार नाही.ऐन दिवाळीत त्यांच्या कुटुंबावर शिमगा करायची वेळ आलेली असताना प्रशासक आडमुठी भुमिका घेत आहे, वास्तविक सहाय्यक निबंधक सुरज जगदाळे व सतिश शेरखाने यांची मिलीभगत असुन अनेक ठेवीदारांच्या ठेवी परत देण्यासाठी त्यांनी लाखो रुपये लोकांकडून उकळले आहेत, अनेक ठेवीदाराकडे त्यांच्या कडुन भ्रष्ट मार्गाने पैसा घेतल्याचे व्हिडिओ देखील आहेत ही बाब गंभीर असून त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बिड यांचे कडे निवेदनाव्दारे शेतकरी कामगार पक्षाने केली असून त्यांच्यावर कार्यवाही न झाल्यास दि.२२अक्टोबर रोजी दुपारी १:०० वा.सहाय्यक निबंधक सहकारी संस्थेच्या कार्यालयासमोर शिमगा आंदोलन करण्याचा इशारा शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड.नारायण गोले पाटील यांच्यासह भाई अशोक कुलकर्णी, भाई सतिश शेजुळ, भाई मुंजा पांचाळ , भाई राहुल सोळंके, भाई चांगदेव शेजुळ, भाई कौस्तुभ जोशी आदिंनी दिला आहे..

## बीड शहरामध्ये दिपावली हर्षोल्हासात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरामध्ये दीपावलीचा सण महालक्ष्मी पूजा करून आणि फटाक्याची आतिश बाजी करून हर्षोल्हासात साजरा करण्यात आला रात्री उशिरापर्यंत फटाक्याची आतिश बाजी चालू होती. दुपारी खरेदीसाठी बाजारातही मोठी गर्दी झाली होती. त्यामुळे काही वेळा वाहतुकीस अडथळा निर्माण झाला. बीड शहरामध्ये पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त लावला होता.**



बीड शहरामध्ये मंगळवारी सकाळीच दिवाळीच्या कामाला सुरुवात झाली. सायंकाळी आपले प्रतिष्ठान आणि प्रत्येकाच्या घरी महालक्ष्मीची पूजा होते. त्यासाठी दिवसभर तयारी सुरू असते. मंगळवारी सकाळीच बीड शहरामध्ये झेंडूच्या फुलांची मोठमोठे दुकाने थाटली गेली. दिवसभर फुलांची खरेदी -विक्री चालू होती. याशिवाय पूजेसाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी भाजी मंडई भागातही मोठी गर्दी झाली होती. सुभाष रोड भागामध्ये यामुळे काही वेळा वाहतुकीची कोंडी झाली. सायंकाळच्या वेळी नागरिकांनी आपापल्या प्रतिष्ठान मध्ये महालक्ष्मीची पूजा केली. याशिवाय प्रत्येक घरातही पूजा झाली. त्यानंतर फटाक्याची आतीश बाजी सुरू झाली. ही आतिषबाजी रात्री उशिरापर्यंत चालूच होती. नागरिकांनी दीपावलीच्या सणानिमित्त एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

## रोटरीच्या वतीने उपेक्षितांना व ज्येष्ठांना फराळाचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**दिवाळीच्या सणाचे औचित्य साधून येथील रोटरीक्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने मानवलोकच्या जन सहयोग कार्यालयासमोर उपेक्षितांना फराळाचे वाटप केले.**



प्रमुख पाहुणे म्हणून मानवलोक स्वयंसेवी संस्थेचे कार्यवाह मा.अनिकेत लोहिया होते . रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा .रोहिणी पाठक यांनी प्रस्ताविक केले तर आभार धनराज सोळंकी यांनी मानले , या प्रसंगी सचिव मंजुषा जोशी, धनराज सोळंकी, राधेशाम लोहिया , प्रकल्प प्रमुख जया अविनाश मुडेगावकर , अजित देशमुख यांची व्यासपीठावर उपस्थिती होती . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवकुमार निराळे यांनी केले. रोटरी क्लबचे पदाधिकारी संतोष मोहिते,कल्याण काळे ,डॉ . नवनाथ घुगे, प्रतिभा देशमुख, मंदाकिनी गित्ते, प्रा . अलका तडकलकर , डॉ . निशिकांत पाचेगावकर, उपप्राचार्य अजय पाठक , हर्षवर्धन वडमारे, राजेंद्र घोडके , शिवकुमार निर्मळे , राम सारडा. शेख शकील , बालाजी घाडगे , डॉ . बालासाहेब लोमटे, प्रविण चोकडा, प्रा रमेश सोनवळकर , डॉ अनिल केंद्रे , शाम सरवदे , संजना आपेट , डॉ लब्धी सोळंकी,दिलीप मारवाळ यांनी फराळ वाटपासाठी पुढाकार घेतला. त्यानंतर धायगुडा पिंपळा येथील भक्तीप्रेम वृद्धाश्रमात जाऊन रोटरी सदस्यांनी जेष्ठ नागरिकांना फराळाचे वाटप केले त्यांच्या जवळ बसून आरोग्य विषयक विचारपूसही केले . त्याच परिसरात रोटरी सदस्यांनी उत्साहात सामुहिक फराळ केला.

## अंबाजोगाई येथील इनरव्हिल क्लबकडून वृध्दाश्रमातील महिलांना साड्या वाटप



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**येथील इनरव्हिल क्लब कडून तालुक्यातील घाटनांदुर येथील गुरुदास वृध्दाश्रमातील महिलांना दिवाळी निमित्त साड्या वाटप करण्यात आल्या.**

दि. १९ ऑक्टोंबर रोजी हा साडी वाटप कार्यक्रम संपन्न झाला. गुरुदास वृध्दाश्रमातील चाळीस महिलांना यावेळी साड्या वाटण्यात आल्या. या महिलांना साड्या वाटून त्यांची दिवाळी आनंदी करण्यासाठी हा उपक्रम इनरव्हिल क्लब, अंबाजोगाई कडून राबविण्यात आला. यावेळी क्लब च्या अध्यक्षा संगीता नावंदर, सचिव कल्पना शिंदे यांच्यासह रेखा शितोळे, सिमा ढाकणे, प्रज्ञा शिंदे, अर्चना स्वामी या इनरव्हिल क्लब सदस्या उपस्थित होत्या. इनरव्हिल क्लब च्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अवैध वाळू वाहतूक प्रकरणात दोन ट्रक जप्त

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यात पाटोदा तालुक्यातील मुगगाव परिसरात अवैध वाळू वाहतुकी विरोधात पोलिसांनी कारवाई करत दोन ट्रक जप्त केले आहेत ही कारवाई जोगदंडवाडी फाट्याजवळ करण्यात आली आहे या कारवाईदरम्यान अमन आदम शेख याला तीन ब्रास वाळूमध्ये ट्रकमध्ये भरून बेकायदेशीर रित्या वाहतूक करताना पकडण्यात आले त्याच दिवशी अमोल भीमराव सोनवणे यालाही तीन ब्रास वाळू वाहतूक करताना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे मी प्रकरणांमध्ये अंबळनेर पोलीस ठाण्यामध्ये नोंद करण्यात आला आहे वाळू माफिया विरोधात कारवाईचा भडगाव उभारत पोलिसांनी वाळू आणि ट्रक दोन्हीही जप्त केले आहे याप्रकारे पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## धुनकवड पंचायत समिती गणातून छायाताई मुंडे निवडणूक लढविणार

वडवणी । प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव व ढगेवाडी ग्रुप ग्रामपंचायतचे विद्यमान उपसरपंच हनुमंत राजेभाऊ मुंडे मागील २० वर्षापासून भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून सामाजिक,राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे तसेच चौसाळा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या नेतृत्वाखाली आपला ठसा या भागात उमटवला आहे कार्यकर्त्यांच्या अग्रस्तव भारतीय जनता पार्टीच्या तिकिटावर धुनकवड पंचायत समिती गणातून निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत.



धुनकवड पंचायत समिती गण सर्वसाधारण महिलांसाठी राखीव सुटलेला आहे हनुमंत बप्पा मुंडे यांचे खूप मोठे कार्य या भागात आहे घरकुल योजना, निराधारांची पेन्शन,शेतकऱ्यांचे, ऊसतोड मजुरांचे समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत थेटे गव्हाण ते वडवणी हा रस्ता दुरुस्त करावा म्हणून त्यांनी जन आंदोलन उभे केले होते, तरुणांना एकत्र आणण्याचं काम त्यांनी केले आहे शिव,शाहू,फुले,आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून चालणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे भारतीय जनता पार्टीचे तिकिटावर धुनकवड पंचायत समिती गणातून निवडणूक लढवावी अशी मागणी कार्यकर्ते करत आहेत म्हणून हनुमंत बप्पा मुंडे यांच्या सौभाग्यवती छायाताई हनुमंत मुंडे या निवडणूक लढवणार आहेत. धुनकवड पंचायत समिती गणामध्ये छायाताई मुंडे यांच्या उमेदवारीची जोरदार चर्चा सध्या सुरू आहे.

## हाजी अराफात शेख यांच्या समाजसेवेच्या उजेडाने वंचितांच्या आयुष्यात पेटली दिवाळी!

**गेवराई । प्रतिनिधी**

**दिवाळी म्हणजे आनंद, प्रकाश आणि एकतेचा सण! मात्र, हा आनंद केवळ घराघरातच नव्हे तर समाजातील वंचित घटकांपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प राज्य मुस्लिम खाटीक समाजाने यंदा समाजसेवेच्या माध्यमातून साकार केला.**

संस्थापक अध्यक्ष हाजी अराफात शेख यांच्या मातोश्री श्रीमती शमा आलमगीर शेख यांच्या प्रेरणेने या वर्षी समाजोपयोगी उपक्रमांची मालिका राबविण्यात आली. या उपक्रमांतून बालग्राम अनाथाश्रमातील निरागस बालकांपासून ते ऊसतोड मजुरांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचवण्यात आला. गेवराई येथील बालग्राम अनाथाश्रम येथे राज्य मुस्लिम खाटीक समाजाच्या वतीने दिवाळी साजरी करण्यात आली. या वेळी अनाथ मुलांना नवीन कपडे, फराळ आणि फटाके वाटप

संस्थापक अध्यक्ष हाजी अराफात शेख, यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी राज्य उपाध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी, प्रवीण आखाडे,जुनेद बागवान विनय मोरे तसेच बीड जिल्ह्यातील अनेक पदाधिकारी उपस्थित होते. पदाधिकाऱ्यांनी मुलांसोबत फटाके वाजवत दिवाळीचा जल्लोष केला. मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे हास्य हीच आमच्यासाठी खरी दिवाळी आहे, असे हाजी अराफात शेख यांनी सांगितले.



तसेच, दारुल उलूम निजामिया रझविया मदरशात विद्यार्थिनींना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. विद्यार्थिनींना स्वावलंबी बनविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या वेळी उपस्थित सदस्यांनी विद्यार्थिनींसोबत दुवा (प्रार्थना) केली.शिक्षणासोबत स्वावलंबन हेच समाजाच्या प्रगतीचे मूळ आहे, असे हाजी अराफात शेख यांनी नमूद केले.याशिवाय, महांडुळा (ता. गेवराई) येथे ऊसतोड मजुरांसाठी दिवाळी साजरी करण्यात आली.या वेळी मजुरांना फराळ, जेवण आणि आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. उपक्रमाच्या पुढाकारात राज्य उपाध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी यांचा विशेष सहभाग होता. या कार्यक्रमात प्रवीण आखाडे,जुनेद बागवान विनय मोरे व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशासाठी सर्वांनी दिलेले सहकार्य कौतुकास्पद ठरले.या सर्व उपक्रमांतून समाजातील वंचित, गरीब आणि श्रमिक घटकांपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचवण्याचा प्रयत्न झाला. समाजातील प्रत्येक घटकाच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलवणे – हीच खरी दिवाळी आहे, असा संदेश या सामाजिक उपक्रमांमधून देण्यात आला.संस्थापक अध्यक्ष हाजी अराफात शेख यांच्या हस्ते दिवाळी भेटवस्तूंचे वितरण करण्यात आले. यातून समाजसेवेची परंपरा आणि माणुसकीचा प्रकाश अधिक उजळल्याचे चित्र सर्वत्र पाहायला मिळाले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जैन बोर्डिंग जागा विक्री व्यवहार 'जैसे थे'; धर्मादाय आयुक्तांकडून मंदिर पाहणीचे आदेश

**पुणे । प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून पुण्याचे राजकीय वातावरण जैन बोर्डिंगच्या विक्री व्यवहारावरून चांगलेच तापले आहे. या बोर्डिंगच्या जागेच्या विक्री व्यवहाराला धर्मादाय आयुक्त मुंबई यांनी स्थगिती दिली आहे. पुढील आदेशापर्यंत हा व्यवहार 'जैसे थे' ठेवण्याचे निर्देश देतानाच जैन बोर्डिंगच्या आवारात मंदिर आहे की नाही, याची पाहणी करण्याचे निर्देश सहधर्मादाय आयुक्त यांना दिले आहेत.




सेठ हिराचंद नेमचंद जैन दिगंबर बोर्डिंगची (जैन बोर्डिंग) जागा काही विश्वस्तांनी बेकायदा विकल्याचा आरोप करीत जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. जैन बोर्डिंग बचाव कृती समितीच्या वतीने या प्रकरणाची तातडीने सुनावणी व्हावी, यासाठी धर्मादाय आयुक्त मुंबई यांच्याकडे २० ऑक्टोबर रोजी याचिका दाखल करण्यात आली होती. ड. सुकौशल जिंतुरकर, ड. योगेश पांडे, लक्ष्मीकांत खाबिया, अक्षय जैन आणि प्रशांत बज यांनी ही याचिका धर्मादाय आयुक्त अमोल कलोटी यांच्याकडे दाखल केली होती.

विश्वस्तांनी कागदपत्रांमध्ये जैन बोर्डिंगच्या जागेत मंदिर नसल्याचे दाखविले होते आणि त्यावर बुलडाणा अर्बन आणि गिरेश्वर क्रेडिट सोसायटीचा बोजा चढविण्यात आला होता. त्यामुळे हे मंदिर नेमके कोणाचे, याविषयीही सुनावणी घेण्यात आली. या व्यवहाराची राज्य सरकारच्या वतीने धर्मादाय आयुक्तांनी दखल घेतली असून, त्याविषयी येत्या २८ तारखेपर्यंत अहवाल सादर करण्याचे निर्देश धर्मादाय सह आयुक्त पुणे यांना देण्यात आले आहेत. जागेची प्रत्यक्ष पाहणी करून मंदिर आहे की नाही, हे तपासण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. ट्रस्टने दाखल केलेल्या तसेच महापालिकेच्या कागदपत्रांमध्ये कुठेही मंदिराचा उल्लेख नाही, त्यामुळे हा विषय खूप गंभीर आहे, असे मत नोंदविले गेले असून, २८ ऑक्टोबरला याविषयी सुनावणी होणार आहे, अशी माहिती ड. योगेश पांडे यांनी दिली.

लक्ष्मीकांत खाबिया म्हणाले की, जैन बोर्डिंग बचाव कृती समितीच्या लढ्याचा हा पहिला टप्पा आहे. भविष्यात अनेक लढाया लढायच्या आहेत. भविष्यातही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची साथ लागणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयावर जैन बोर्डिंग बचाव समितीच्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता, त्याची दखल मुख्यमंत्री यांनी घेतली होती. जैन समाजावर कुठल्याही प्रकारे अन्याय होऊ देणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले होते, याची प्रचिती आजच्या घटनेवरून आली आहे.

# घरात घुसून एकट्या महिलेला बेदम मारहाण, अडीच तोळ्यांचे दागिने लुटले

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूरच्या बेट भागातील जांबूत (शरदवाडी) परिसरात शनिवार (दि.१८) रात्री साडेअकराच्या सुमारास सिंधुबाई शांताराम गुजर या महिलेच्या घरी घरफोडी करून त्यांना जबर मारहाण करीत त्यांच्या अंगावरील अडीच तोळे सोने ओरबडून चोरट्यांनी पोबारा केला. यावेळी सिंधुबाई गुजर यांना जबर मारहाण केली. स्थानिकांनी त्यांना उपचारासाठी खासगी दवाखान्यात दाखल केले होते.जांबुत (शरदवाडी) परिसरात जोरीलवण वस्तीवर सिंधुबाई गुजर या घरात एकट्याच राहत असून रात्रीच्या वेळी त्या जेवण करून झोपलेल्या असताना तीन चोरट्यांनी त्यांच्या दारावर दगड टाकून टिकावाच्या साह्याने घराचा दरवाजा तोडून घरामध्ये प्रवेश केला.



सिंधुबाई गुजर यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी त्यांच्या कानातील दागिने ओरबडून अंगावरील दागिने हिसकावून घेत चोरटे दुचाकीवरून पंचतळे, पिंपरखेडच्या बाजूला पळून गेल्याचे स्थानिकांनी यावेळी सांगितले. यावेळी जोरीलवण वस्तीवरील चोरट्यांचा पाठलाग केला असता पंचतळे परिसरात दुचाकी सोडून अंधारात चोरट्यांनी पळ काढला.पंधरा दिवसापासून या भागात भागात बिबट्याने हौदोस माजवला असल्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिक घराबाहेर पडण्यास घाबरत आहेत.

अशातच बिबट्यांची भीती नागरिकांच्या मनामध्ये असून त्यात अशा प्रकारच्या होणाऱ्या चोऱ्यांमुळे जांबूत परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झालेले आहे. एका बाजूला बिबट्याची भीती आणि दुसऱ्या बाजूला चोरट्यांचा धुमाकूळ यामुळे या परिसरातील महिलांसह ग्रामस्थ देखील भयभीत झाले असून तातडीने या चोरट्यांचा बंदोबस्त करून त्यांना जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

चोरट्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी पैलवान प्रशांत जोरी यांनी केली. घटनेची माहिती मिळताच शिरूरचे पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या सूचनेवरून पोलीस उपनिरीक्षक दिलीप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली टाकळी हाजी दूरक्षेत्राच्या रात्रगस्तीवर असणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला आहे.

## उंड्री- पिसोळी रस्त्यावर दारू दुकानात चोरी; दीड लाखाची रोकड लंपास

**पुणे । प्रतिनिधी**

कोंढवा परिसरात मागील काही दिवसांत चोरी आणि घरफोडीच्या घटना वाढल्या आहेत. उंड्री-पिसोळी रस्त्यावरील एअरकिंग वाइन शॉपचा दरवाजा उचकटून चोरट्यांनी दीड लाख रुपयांची रोकड आणि बिअरच्या दोन बाटल्या लांबविल्या. ही घटना १९ ऑक्टोबरच्या मध्यरात्री घडली.

याबाबत मद्य विक्री दुकानातील कर्मचाऱ्याने कोंढवा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास दुकानाचा दरवाजा उचकटून गल्ल्यातील एक लाख ५७ हजार रुपयांची रोकड आणि बिअरच्या दोन बाटल्या चोरल्या. दुसऱ्या दिवशी सकाळी दुकान उघडले असता चोरीचा प्रकार उघडकीस आला. चोरीची माहिती मिळताच कोंढवा पोलिस घटनास्थळी दाखल झाले. दुकानातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासून चोरट्यांचा शोध घेण्यात येत आहे. प्राथमिक तपासात दोन चोरटे घटनास्थळी आले असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक अश्विनी पाटील करीत आहेत.

## दहाव्या मजल्यावरील गॅलरीत फटाक्यातील रॉकेट पडल्याने घरातील साहित्य जळून खाक

**फुरसुंगी रस्त्यावरील इमारतीच्या गॅलरीत फटाक्याचे रॉकेट पडून पडदा पेटल्याने सदनिकेत आग लागली**



**पुणे । प्रतिनिधी**

फुरसुंगी रस्त्यावरील एका उंच इमारतीत दहाव्या मजल्यावरील गॅलरीत फटाक्याचे रॉकेट पडून पडदा पेटल्याने सदनिकेत आग लागल्याची घटना सोमवारी (दि.२०) रात्री उशिरा घडली. या आगीमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, दिवाळी सणानिमित्त फटाके फोडण्याच्या उत्साहात काही नागरिकांनी उंच इमारतींच्या परिसरात रॉकेट फोडले. त्यापैकी एक रॉकेट दहाव्या मजल्यावरील गॅलरीत जाऊन पडले. त्यामुळे पडदा पेट घेतला आणि काही क्षणांत गॅलरीतील भागात आग पसरली. त्यामुळे काही साहित्य जळून खाक झाले आहे.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी अल्पावधीतच आग नियंत्रणात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. फटाके फोडताना विशेष काळजी घ्या. उंच इमारतींच्या आसपास रॉकेट किंवा आकाशबाण उडवू नयेत. सुरक्षित जागी फटाके फोडा आणि अग्निसुरक्षेचे नियम पाळा, असे आवाहन पुणे महानगरपालिका आणि अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.

# मी एनआयएचा अधिकारी बोलतोय, तुमचं नाव पहलगाम दहशतवादी हल्ल्यात आलंय; पुण्यातील वृद्धाला भामट्याचा फोन, तब्बल दीड कोटींना गंडा

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय तपास संस्था (एनआयए) अधिकारी असल्याचा बनाव करत पुण्यात एका ७० वर्षीय नागरिकाची तब्बल १ कोटी ४४ लाख ६० हजारांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तुमचं नाव पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी (झरहरश्रसरा ढर्शीी –ींरलज्ञ) जोडलं गेलंय अशी भीती दाखवत चोरट्याने हा आर्थिक गंडा घातला. पुण्याच्या (झींपश) सायबर पोलीस ठाण्यात (ऊलशी झेश्रळलश डींरींळेप) याप्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



तक्रारदार हे पुण्यातील कोथरुड येथील महात्मा सोसायटी रस्त्यावर राहणारे आहेत. २३ सप्टेंबर २०२५ ते ०८ ऑक्टोबर २०२५ दरम्यान त्यांना एक अनोळखी क्रमांकावरून फोन आला. फोनवरील व्यक्तीने स्वत:ला एनआयएचा वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवले. त्याने सांगितले की, तुमचं बँक खातं पहलगाम दहशतवादी हल्ल्याशी संबंधित आर्थिक व्यवहारात वापरण्यात आलं आहे. त्यामुळे तुमच्यावर गंभीर संशय आहे. जर सहकार्य केलं नाही, तर कायदेशीर कारवाई होईल. अचानक आलेल्या या धमकीने घाबरून गेलेल्या वृद्ध तक्रारदाराला चोरट्याने पुढची प्रक्रिया सांगितली. संपूर्ण तपास पूर्ण होईपर्यंत तुमच्या सर्व बँक खात्यातील रक्कम तात्पुरती 'सुरक्षित खात्यात' ट्रान्सफर करावी लागेल. यानंतर घाबरलेल्या तक्रारदाराने वेगवेगळ्या खात्यांतून १.४४ कोटी रुपये चोरट्याने सांगितलेल्या खात्यांवर पाठवले. काही दिवस गेल्यानंतरही रक्कम परत मिळाली नाही, आणि संबंधित व्यक्तीशी संपर्कही तुटला. यानंतर तक्रारदाराने सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली. तक्रारीवरून पुणे सायबर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात भारतीय दंड संहिता व माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मधील कलम ६६ (डी) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलीस पुढील तपास करत आहेत. पोलिसांनी नागरिकांना सतर्कतेचं आवाहन केलं आहे. कोणतीही अनोळखी व्यक्ती स्वतःला सरकारी यंत्रणेतील अधिकारी असल्याचं सांगून तुमच्याकडून पैसे मागत असेल, तर अशा प्रकरणांना गांभीर्याने न घेता तत्काळ सायबर पोलिस ठाण्याशी संपर्क साधा, असा सल्ला देण्यात आला आहे.

# रहेजा विस्टा सोसायटीजवळ दुचाकीला कारची धडक; डिलिव्हरी बॉयचा जागीच मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

महंमदवाडी परिसरातील रहेजा विस्टा सोसायटी समोर सकाळी साडेसहाच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका तरुण डिलिव्हरी बॉयचा मृत्यू झाला. या घटनेत कारचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मृत तरुणाचे नाव सन्नी अंबादास मिसाळ ( २७, रा. ताडीवाला रोड, पुणे) असे असून, तो सुपरवायझर म्हणून काम करत होता. त्याचा भाऊ बाबु अंबादास मिसाळ (२९) यांनी काळेपडळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीच्या माहितीनुसार, आरोपी अमान समीर मणीयार (२१, रा. हांडेवाडी, पुणे) याने आपल्या ताब्यातील फिएट पिंटो कार (चक०२ उङ ७४८३) ही अतिवेगाने व बेदरकारपणे चालवून सन्नी मिसाळ यांच्या स्कुटी (चक १२ दक्र ०२१६) ला मागून जोराची धडक दिली. या धडकेत सन्नी गंभीर जखमी होऊन घटनास्थळीच मृत्यूमुखी



पडले.

या प्रकरणी काळेपडळ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय सहिता २०२३ चे कलम १०६, २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पोलिस स्मृतीदिनानिमित्त पुण्यात हुतात्म्यांना आदरांजली, उपमुख्यमंत्र्यांनी अर्पण केले पुष्पचक्र

**पुणे । प्रतिनिधी**

देशासाठी प्राणार्पण केलेल्या शूर पोलिस जवानांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी पाषाण येथे मंगळवारी (ता. २१) पोलिस स्मृतीदिनानिमित्त शोक कवायतीचे आयोजन करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पोलिस स्मृतीस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. या प्रसंगी राज्यातील वरिष्ठ पोलिस अधिकारी, कर्मचारी आणि कुटुंबीय उपस्थित होते.



लडाखमधील हॉटस्प्रिंग येथे २१ ऑक्टोबर १९५९ रोजी चिनी सैन्याने केंद्रीय निमलष्करी पोलिस दलाच्या तुकडीवर हल्ला केला. या हल्ल्यात दहा पोलिस जवानांनी वीरमरण पत्करले. त्यांच्या शौर्याची आठवण ठेवण्यासाठी दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस 'पोलिस स्मृतीदिन' म्हणून देशभर पाळला जातो. या दिवशी देशाच्या सेवेत प्राणार्पण केलेल्या सर्व पोलिस कर्मचाऱ्यांना आदरांजली अर्पण करण्यात येते.

पुणे पोलिसांकडून पाषाण येथील पोलिस संशोधन केंद्रात सकाळी शोक कवायतीचे आयोजन करण्यात आले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्मृतीस्तंभावर पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. त्यानंतर उपस्थित पोलिस जवानांनी बंदुकीतून फैरी झाडून हुतात्म्यांना मानवंदना दिली. पोलिस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक सुनील रामानंद, दळणवळण, माहिती-तंत्रज्ञान व परिवहन विभागाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक दीपक पांडे, पोलिस सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, पुणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल आदी यावेळी उपस्थित होते.

# वेल्हे तालुक्याच्या विकासाला खिळ घालणाऱ्या पुढाऱ्यांचा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने जाहीर निषेध

**वेल्हे । प्रतिनिधी**

वेल्हे तालुक्यातील चेलाडी ते मढेघाट या रस्त्याच्या दीर्घकाळ प्रलंबित मागणीवर पुन्हा एकदा शिवसेनेने आवाज उठवला आहे. तालुक्याच्या विकासाला अडथळा ठरणाऱ्या राजकीय नेत्यांचा आणि पुढाऱ्यांचा जाहीर निषेध व्यक्त करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने प्रशासनाला लेखी निवेदन दिले आहे.



शिवसेनेचे तालुका प्रमुख श्री. उमेश काळुराम नलावडे यांनी सहाय्यक पोलीस अधीक्षक, राजगड (वेल्हे) तसेच तहसीलदार श्रीनिवास ढाणे यांना निवेदन सादर करत या विषयात गंभीर भूमिका मांडली. नलावडे यांनी निवेदनात म्हटले आहे की, वेल्हे-मढेघाट हा रस्ता गेल्या ५० वर्षांपासून प्रलंबित आहे. या रस्त्यामुळे महाड व पुणे जिल्ह्याला जोडणारा महत्त्वाचा मार्ग उभा राहणार आहे. तरीही तालुक्यातील काही राजकीय नेत्यांनी या रस्त्याकडे दुर्लक्ष करून, पानशेत खोऱ्यातील घोलते-कुंभे रस्त्याला प्राधान्य दिले आहे. चर्चेत नसतानाही हा रस्ता मंजूर झाला, मात्र आमचा मढेघाट रस्ता आजही रखडलेलाच आहे.

नलावडे यांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त करत म्हटले की, या अन्यायाला आता जनता गप्प बसणार नाही. चेलाडी-मढेघाट हाच रस्ता मंजूर झाला पाहिजे, ही शिवसेनेची ठाम व आग्रही मागणी आहे. अन्यथा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने मोठ्या प्रमाणात आंदोलन उभारले जाईल.या निवेदनावर स्थानिक नागरिकांचा मोठा प्रतिसाद दिसून आला आहे. अनेक ग्रामस्थांनी देखील या रस्त्याची गरज अधोरेखित करत, प्रशासनाने तात्काळ पावले उचलण्याची मागणी केली आहे.तालुक्याच्या विकासाला गती देण्यासाठी आणि गावागावातील संपर्क वाढवण्यासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असल्याचे मत स्थानिक ग्रामस्थांनीही व्यक्त केले. आता प्रशासन आणि राजकीय नेतृत्व यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

